रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २१२
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १८ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

पनवेलमध्ये हळदीकुंकू समारंभात आरोग्याचे वाण/३
अपघातात एअरबॅगमुळे जीवितहानी टळली/५
यशस्वीचे शतक; भारताकडे ३२२ धावांची आघाडी/८

## ८५ हजार कोटींच्या शस्त्रास्त्र खरेदीला मंजुरी



**नवी दिल्ली :** देशाची संरक्षण यंत्रणा बळकट करण्यासाठी, सैन्याचे हात ताकदवान करण्यासाठी संरक्षण अधिग्रहण परिषदेने ८४,५६० कोटी रुपयांच्या शस्त्रास्त्रांच्या खरेदीला मंजुरी दिली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. देशाला चीन आणि पाकिस्तानकडून धोका वाढतच चालला आहे. यामुळे अधिक शस्त्रसामुग्रीची गरज भासणार आहे. या खरेदी प्रस्तावामध्ये १५ ट्विन टर्बोप्रॉप सी-२९५ विमाने खरेदी करण्यात येणार आहेत. यापैकी नऊ नौदलासाठी आणि सहा तटरक्षक दलासाठी असतील. टाटा आणि एअरबस मिळून हे विमान बनवत आहेत. हवाई दलासाठी ५६ विमाने तयार केली जात आहेत. याशिवाय चीन आणि पाकिस्तान यांच्या सीमेवर लक्ष ठेवण्यासाठी हवाई दल आणि डीआरडीओ संयुक्तपणे विविध शस्त्रास्त्रे खरेदी करणार आहे.

# वारसा सांगणाऱ्यांनी आधी आरसा बघावा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महाअधिवेशनातून शरसंधान




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आम्ही शिवसेना आणि धनुष्यबाण वाचवला. वारसा सांगणाऱ्यांनी आधी आरसा पाहिला पाहिजे. स्वतःची कर्तृत्व आरशात बघावीत. काहीही लपून राहत नाही. बाळासाहेबांचा वारसा सांगण्यासाठी मनगटात ताकद असावी लागते, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.१७) शिवसेनेच्या महाअधिवेशनात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर शरसंधान साधले.

कोल्हापूरच्या महासैनिक दरबार मैदानात आयोजित शिवसेनेच्या महाअधिवेशनात दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री शिंदे यांनी समारोपाच्या भाषणात विस्तृतपणे भूमिका मांडली. आम्हाला शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्ह जेव्हा मिळाले तेव्हा शिवसेनेच्या खात्यातून ५० कोटी रुपये मिळायला हवेत, असे पत्र उद्धव ठाकरेंनी आम्हाला पाठविले होते. यांना बाळासाहेबांचा विचार नको, पैसे हवे होते. मी त्यांना ५० कोटी रुपये देऊन टाकले. हे पैसे मागताना तुम्हाला जनाची नाही तर मनाची लाज पाहिजे होती, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. **(पान २ वर..)**

## उद्धव ठाकरेंनी भाजपला दोनदा फसवले

मी कधी खोटे बोलत नाही. दिल्लीत तुम्ही (उद्धव ठाकरे) पंतप्रधान नरेंद्र मोदींना वचन देऊन आला होतात. आपण एकत्र येऊन पुन्हा युती करूया, असे त्या वेळी सांगितले होते, पण तरीही तुम्ही युती केली नाही. एकदा नाही, तर दोनदा तुम्ही भाजपला आणि पंतप्रधान मोदींना फसवले. मग तुम्ही आमच्यावर कसे आरोप करू शकता. आम्हाला गद्दार, बेईमान बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही. उलट आम्ही शिवसेना आणि धनुष्यबाण वाचवला, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी म्हणत उद्धव ठाकरे यांच्या दुटप्पी भूमिकेचा समाचार घेतला.

# अटल सेतूमुळे रायगडच्या विकासाला वाव

## मंत्री गिरीश महाजन यांचे उरण पिरकोनमध्ये प्रतिपादन

### विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण

### शेकापचे जीवन गावंड समर्थकांसह भाजपमध्ये दाखल



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रायगड जिल्ह्याला सुमारे २४० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला असून हा सुंदर परिसर मन मोहून टाकतो. अटल सेतूमुळे मुंबईजवळ हा परिसर आला आहे. येथील विकासाला मोठा वाव मिळणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी केले. ते उरण तालुक्यातील पिरकोन येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून डीपी वर्ल्डच्या सीआरएस फंडातून सुमारे सात कोटी रुपये खर्च करून खोपटे गावात उभारण्यात आलेल्या शाळांच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा आणि विविध विकासकामांचे भूमिपूजन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१६) पिरकोन येथे झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी शेकापचे माजी जि.प सदस्य जीवन गावंड व कलावती गावंड यांनी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले.

या समारंभास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, उरण शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक कौशिक शाह, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, जि.प.चे माजी सदस्य विजय भोईर, ज्ञानेश्वर घरत, पिरकोनच्या सरपंच कलावती पाटील, बांधपाडा सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, भाजप तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, माजी अध्यक्ष हेमंत म्हात्रे, कुलदीप नाईक, समीर मढवी, कामगार नेते जितेंद्र घरत, केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, संदीप पाटील, विलास पाटील, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, सुशांत पाटील, उद्योजक व्ही.एस. पाटील, माजी उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा यांच्यासह आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री गिरीश महाजन यांनी आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले की, जनतेची कामे कशी करून घ्यावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमदार महेश बालदी. **(पान २ वर..)**

### शेकापने विकास न करता भांडणे लावण्याचे काम केले -आमदार महेश बालदी

या वेळी आमदार महेश बालदी यांनी शेकापवर हल्लाबोल केला. विकास न करता शेकापने भांडणे लावण्याचे काम केले. त्यामुळे हा भाग मागास राहिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश बदलत असून या भागाचा झपाट्याने विकास करणे मी माझे कर्तव्य समजतो. टीका करणाऱ्यांवर आपण टीका करायची नाही. आपण आपल्या कामाने टिकेला उत्तर द्यायचे, कारण जनतेला विकास हवा आहे, टीका नाही, असेही ते म्हणाले.

## निवडक

### 'दंगल'फेम अभिनेत्री सुहानी भटनागरचे निधन



**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता आमिर खानच्या दंगल चित्रपटात छोट्या बबिता फोगाटची भूमिका साकारणारी अभिनेत्री सुहानी भटनागर हिचे अवघ्या १९व्या वर्षी निधन झाले आहे. वृत्तानुसार या अभिनेत्रीचा काही दिवसांपूर्वी पाय फ्रॅक्चर झाला होता. उपचारादरम्यान चालू असलेल्या औषधांचा तिच्या शरीरावर दुष्परिणाम झाला. शरीरात अतिरिक्त द्रव जमा होऊन तिचे निधन झाल्याचे सांगितले जात आहे.

### कवी गुलजार, संस्कृत अभ्यासक रामभद्राचार्यांना ज्ञानपीठ पुरस्कार





**नवी दिल्ली :** प्रसिद्ध उर्दू कवी, शायर, गीतकार गुलजार आणि संस्कृत पंडित रामभद्राचार्य या दोघांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला आहे. ५८व्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी या दोघांची निवड करण्यात आली आहे.

# पेणमध्ये ड्रग्ज निर्मिती करून विक्री करणारे रॅकेट उद्ध्वस्त

## आठ आरोपी गजाआड; लाखोंचे ड्रग्ज, साहित्य जप्त



**पेण : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी खोपोलीत ड्रग्स बनविण्याच्या कारखान्याचा भांडाफोड झाल्याचे प्रकरण ताजे असतानाच ड्रग्ज निर्मिती व विक्रीचे रॅकेट पोलिसांनी उद्ध्वस्त करून आठ सराईत आरोपींना अटक केली आहे. पेणमधील कलद गाव येथे हा अड्डा होता. पोलिसांनी लाखोंचे ड्रग्ज, साहित्य व वाहने जप्त केली आहेत.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ड्रग्जची विक्री करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी पोलिसांना आदेश दिले होते. या अनुषंगाने कारवाई करताना पथकाने जयेश प्रदीप कांबळी उर्फ गोलू (वय २५, रा. डॉ.आंबेडकर रोड, ठाणे, विघ्नेश विनायक शिर्के उर्फ विघ्न्या (वय २८, रा. वर्तकनगर, ठाणे) यांना ७८.८ ग्रॅम एमडी ड्रग्जसह ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. **(पान २ वर..)**

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये सोलर सिस्टिम

## 'रयत' पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीवर लेव्हीकॉन इंडिया सिस्टीम प्रा.लि. कंपनी पनवेलचे प्रोप्रायटर केदार नाडगौंडी यांच्यामार्फत ९० किलो वॅटचे सोलर पॅनल बसविण्यात आले आहेत. या सोलर सिस्टिमचे उद्घाटन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१७) करण्यात आले.

या समारंभास 'रयत'चे सहसचिव (माध्यमिक) बंडू पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी.एस. वडजे, डी.बी. पाटील, जोत्स्ना ठाकूर, जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, जे. जी. जाधव, रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, वावंजे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जी.आर. पाटील, नावडे स्कूल कमिटीचे माजी चेअरमन पंढरीनाथ पाटील, रायगड विभागीय निरीक्षक बाळासाहेब कारंडे, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी उपस्थित होते.




# श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाउंडेशनकडून कर्तृत्वसंपन्न व्यक्ती आणि संस्थांचा गौरव

**पुणे : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे संसदरत्न खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्तव्यसंपन्न व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, सिनेअभिनेते अशोक समर्थ यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पिंपरी येथे झाला. या वेळी डॉ. मोरे यांनी बोलताना रामकृष्ण मोरे यांनी शहरातील अनेकांना घडवले, पण त्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्याचे काम फक्त आप्पांनीच केले, अशा भावना व्यक्त केल्या.

समारंभास खासदार श्रीरंग बारणे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख विश्वजीत बारणे, नामदेवराव जाधव, कविचंद भाट, नारायण बहिरवडे, निलेश तरस, मधुकर कंद, ज्ञानेश्वर दळवी, रवी नामदे, उदय आवटे, धनाजी बारणे, माऊली घोगरे, बाळासाहेब वाघमोडे आदी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.




डॉ. सदानंद मोरे पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज जिथे घडले त्या भागातले आपण आहोत याचा आपल्या प्रत्येकाला अभिमान आहे. ज्या लोकप्रतिनिधींकडून सर्वसामान्य जनतेची कामे होतात ते लोकप्रतिनिधी कायम निवडून येतात

खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, माझ्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात डॉ. रामकृष्ण मोरे यांच्यामुळे झाली. मी २२ वर्ष महापालिकेत काम केले. स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेता, गटनेता म्हणून काम केले. जनतेचे आशीर्वाद आणि प्रेमाच्या जोरावर मी आज संसदेत चांगल्या प्रकारे काम करू शकत आहे. सिनेअभिनेते अशोक समर्थ, नामदेवराव जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. विश्वजीत बारणे यांनी प्रास्ताविक केले, तर हनुमंत माळी यांनी आभार मानले.

## न्हावा शेवा बंदरात चायनीज फटाके जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

न्हावा शेवा बंदरात सीमाशुल्क विभागाने केलेल्या कारवाईत ४० मेट्रीक टन चायनीज फटाके जप्त करण्यात आले आहेत. त्यांची किंमत ११ कोटी रुपये आहे. स्वच्छतेसाठी वापरण्यात येणारे ब्रश व मॉपच्या नावाने फटाक्यांची ही तस्करी करण्यात येत होती.

सीमाशुल्क विभागाला ४० फुटांच्या कंटेनरमध्ये चीनमधून फटाके आणण्यात आल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे सीमाशुल्क विभागाने न्हावा शेवा परिसरात हा कंटेनर अडवला. त्याची तपासणी केली असता त्यात विनापरवाना फटाके आणण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून ते जप्त करण्यात आले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## रस्ता भूमिपूजन



**पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या ग्रामविकास निधीतून आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बारापाडा जोडरस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी झाले. या समारंभास आमदार महेश बालदी, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जि.प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच शेखर कानडे, कर्नाळा विभागीय अध्यक्ष चंद्रकांत पाटील, अमोघ ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

# राज्यात २६४ नवीन महाविद्यालये होणार

## शासनाच्या धोरणानुसार इरादापत्र मंजूर




**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यातील २६४ संस्थांना नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी इरादा पत्र देण्याचा निर्णय राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला असून याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे. मुंबईतील श्रीमती नाथीबाई ठाकरसी दामोदर महिला विद्यापीठ (एसएनडीटी) विद्यापीठाला सर्वाधिक ८२ महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालये सुरू करण्याबाबत हे इरादापत्र मंजूर करण्यात आले आहे.

शासनाकडून नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी देण्यात येणारे इरादा पत्र ३१ जानेवारी २०२५ पर्यंत वैध असणार आहे. इरादा पत्र मिळाल्यानंतर संबंधित संस्थेला शासनाच्या विहित अटी व शर्तींची पूर्तता करणे बंधनकारक असेल. या अटी व शर्तींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल अंतिम मान्यतेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठाला संबंधित महाविद्यालयांना संलग्नता देता येणार नाही. तसेच महाविद्यालयांना कोणत्याही परिस्थितीत इरादापत्राच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाहीत, या नियमाचे उल्लंघन केल्यास यासंदर्भातील कायद्यातील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयावर कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर इरादापत्रही रद्द करण्यात येईल.

मुंबई विद्यापीठाचे परिक्षेत्र हे मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांत असून सध्या एकूण ८७२ महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्नित आहेत. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून मुंबई विद्यापीठास १४ नवीन महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यापैकी मुंबईत चेंबूर आणि दहिसर येथे प्रत्येकी १ यानुसार एकूण दोन, ठाणे जिल्ह्यात सहा, पालघर जिल्ह्यात तीन, रायगड जिल्ह्यात दोन आणि रत्नागिरी जिल्ह्यात एक महाविद्यालय आहे. या विविध महाविद्यालयांना कला, विज्ञान, वाणिज्य शाखा, लेखा आणि वित्त, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, डाटा विज्ञान, आदरातिथ्य अभ्यास, संगणक शास्त्र हे अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

या विद्यापीठांना महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता मुंबईतील एसएनडीटी विद्यापीठाला बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, गोंदिया, जालना, परभणी आदी विविध जिल्ह्यांत सर्वाधिक ८२ महाविद्यालये, त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास ५९, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठास २९, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास २०, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास १६, मुंबई विद्यापीठास १४, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठास १३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास ११, कोल्हापूरमधील शिवाजी विद्यापीठास १०, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास पाच आणि गोंडवाना विद्यापीठास पाच अशी एकूण २६४ नवीन महाविद्यालये येत्या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने इरादा पत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. कला, विज्ञान, वाणिज्य या पारंपरिक शाखांसह विधि, लेखा आणि वित्त, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, डाटा विज्ञान, आदरातिथ्य अभ्यास, पत्रकारिता आदी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम नवीन महाविद्यालयात सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

# म्हसळ्यात होणार मुबलक पाणीपुरवठा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रकल्पाचे भूमिपूजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत म्हसळा शहरासाठी रु.४३ कोटी इतक्या रकमेच्या निधीची प्रशासकीय मान्यता मिळाली असून म्हसळा नगर पंचायत हद्दीतील मोठ्या लोकवस्तीच्या नागरिकांना पिण्याचे मुबलक आणि स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा, यासाठी म्हसळा शहराला शुद्ध आणि मुबलक पाणी पुरवठा प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि. १७) झाले.




म्हसळा येथे आयोजित कार्यक्रमासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, नगराध्यक्ष संजय कर्णिक, उपनगराध्यक्ष संजय दिवेकर, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड उपस्थित होते.

या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या प्रकल्पामुळे म्हसळा नगर पंचायत हद्दीतील नागरिकांना मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा होणार आहे. खासदार सुनिल तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे या प्रकल्पाच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्याला युग पुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा आणि शाहूफुले आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. म्हसळा तालुक्यातील विकास कामांसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

शासनाच्या योजनांचा जनतेला जास्तीत जास्त फायदा कसा होईल, राज्यशासनामार्फत यावर विशेष भर दिला जात आहे. यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाची माहिती दिली. शेतकऱ्यांना पीक विमा, आर्थिक सहाय्य, शेतीसाठी ० टक्के व्याजाने कर्ज पुरवठा, वीज, पाणी, रस्ते विकासासाठी शासनाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. तसेच राज्यातील महिला आणि मुलींचा मान सन्मान वाढविणे, आठ लक्ष रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना मोफत उच्च व तंत्र शिक्षण घेता यावे, यासाठी शासनाने महत्वपूर्ण असा निर्णय घेतला आहे असेही श्री. पवार यांनी सांगितले.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, म्हसळा तालुक्यातील मोठमोठ्या विकास कामांसाठी निधीची उपलब्धता करून दिल्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली असून पर्यटकांची संख्या चार ते पाच पटीने वाढली आहे. येत्या वर्षभरात या प्रकल्पाच्या कामाचे उद्घाटन होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी म्हसळा शहराला पाणीपुरवठा योजनेसाठी ४३ कोटी रुपये मंजूर झाले असल्यामुळे त्यांचे आभार मानले तसेच म्हसळा तालुक्यात नगर पंचायत कार्यालय आणि तहसिलदार प्रशासकीय इमारत बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

# पोलादपूर शहर भाजप महिला मोर्चा कार्यकारिणी जाहीर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

भाजप शहर महिला मोर्चा कार्यकारिणी पोलादपूर शहर अध्यक्षा उज्वला शेठ यांनी जाहिर केली असून नवीन महिला पदाधिकाऱ्यांमुळे शहरातील महिला वर्गामध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

भाजप पोलादपूर शहर महिला मोर्चा कार्यकारिणीमध्ये अध्यक्षा उज्वला तथा माई जयंत शेठ, शहर सरचिटणीस कलिका अधिकारी, योगिता मनोज भागवत, शहर उपाध्यक्षा तनुजा भागवत, वैशाली जोशी, अर्चना समाधान शेठ, शहर चिटणीस शिल्पा शिंदे, नयना शेठ, शिला बुटाला, शहर सदस्या कायम निमंत्रित दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षा रचना धुमाळ, नगरसेविका अंकिता जांभळेकर निकम, शहरसदस्या सपना बुटाला, जान्हवी तलाठी, उज्वला शेठ, निला तलाठी, अस्मिता पवार, वैशाली गणेश शेठ, जयश्री पवार, सोनिया शेठ, मृणाल शेठ, प्रवेशा घोसाळकर, विशाखा आंबेतकर, रश्मी दिक्षित, प्रज्ञा सुर्वे, अनुसया पटेल आदींची नियुक्ती कार्यकारिणीच्या यादी जाहिर करण्यात आली आहे. पोलादपूर शहरातील विविध प्रभागांमधील महिलांच्या नियुक्त्या जाहिर झाल्याने महिला वर्गामध्ये उत्साह वाढला आहे.

## पान १ वरुन

### वारसा सांगणाऱ्यांनी आधी आरसा बघावा

मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्यांना भर सभेतून व्यासपीठावरून खाली उतरायला लावले होते? त्यांचे घर जाळायला माणसे पाठवली? हे कोणाचे कारस्थान असा आरोप करून ज्यांना जोशींचे घर जाळायला पाठवले ती माणसे आज आपल्याबरोबर आहेत, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अशोक चव्हाण दिल्लीला गेले होते. ठाकरे कुटुंबातील गैरव्यवहार बाहेर येऊ लागल्यानंतर ही भेट झाली होती. तेव्हा बैठक संपल्यानंतर अजित पवार आणि अशोक चव्हाण यांना बाहेर थांबवून उद्धव ठाकरे यांनी बंद दाराआड पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा केली. बाहेर आल्यानंतर तुम्हाला घाम आला, तुम्ही दोन ग्लास पाणी प्यायलात हे मला अजित पवार आणि अशोक चव्हाण यांनी सांगितले.

आमच्यावर कसला आरोप करताय. उद्धव ठाकरेंवर आलेली संकटे मी छातीवर घेतली आहेत. माझ्याकडे खूपकाही आहे. बऱ्याच गोष्टी आहेत. जेव्हा बोलायची वेळ येईल तेव्हा मी नक्की बोलेन. मातोश्री आता उदास हवेली झाली आहे. बाळासाहेब ठाकरे असताना ते मंदिर होते, अशी बोचरी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

या अधिवेशनात अनेक महत्त्वाचे ठराव आपण संमत केले असून वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अयोध्येतील राम मंदिर बांधण्याचे तसेच ३७० कलम रद्द करण्याचे स्वप्न पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचा अभिनंदनाचा ठराव संमत केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आगामी लोकसभा निवडणुकीत ४५हून अधिक जागा जिंकायचा आहेत. प्रत्येक मतदारसंघात पंतप्रधान मोदीजी हेच आपले उमेदवार आहेत असे समजून पूर्ण ताकदीनिशी कामाला लागण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सगळ्यांना दिले. या वेळी शिवसेनेचे सर्व नेते, मंत्री, खासदार, आमदार, उपनेते पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अटल सेतूमुळे रायगडच्या विकासाला वाव

ते माझ्याकडून विकासकामांसाठी पाठपुरावा करून निधी घेऊन गेले. मी सहा वेळा आमदार झालो. मंत्री आहे. सातव्यांदा आमदार होईन हे कशामुळे शक्य आहे, तर विधायक काम केल्याने, लोक जोडल्याने. आमदार महेश बालदी हेही असेच काम करीत आहेत याचा मला अभिमान आहे.

आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही विचार मांडून भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांचा विश्वास सार्थ ठरवू, असे सांगितले, तर जीवन गावंड यांनी आपण परिसराच्या विकासासाठी भाजपच्या राष्ट्रीय प्रवाहात सहभागी झालो असल्याचे स्पष्ट केले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना या कार्यक्रमात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने खोपटे फाटा ते बंदर रस्ता डांबरीकरण व काँक्रीटीकरण, कोप्रोली स्मशानभूमी ते प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत रस्ता डांबरीकरण, मुख्यमंत्री पेयजल योजेअंतर्गत पाईपलाईन व पाण्याची टाकी बांधणे, पाणदिवे दत्तमंदिर सामाजिक सभागृह बांधणे, सारडे येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे, पुनाडे आदिवासी रस्ता तयार करणे, आवरे ग्रामपंचायत येथील तलाव सुशोभीकरण करणे, पिरकोन ग्रामपंचायत येथील अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे, बौद्धवसईतील सामाजिक सभागृह बांधणे, सामाजिक सभागृह बांधणे अशी कामे मार्गी लागली आहेत. याबद्दल नागरिकांनी आभार मानले.

### पेणमध्ये ड्रग्ज निर्मिती करून विक्री करणारे रॅकेट उद्ध्वस्त

यानंतर आरोपींना ड्रग्ज पुरविणारे अहमद मोहम्मद शफी शेख उर्फ अकबर खाऊ (वय ४१, रा. कुर्ला, मुंबई) आणि शब्बीर अब्दुल करीम शेख (वय ४४, रा. कुर्ला, मुंबई) यांना वसईतील चिंचोटी येथून अटक केली. त्या वेळी आरोपींकडून २६ ग्रॅम एमडी व चार किलो ८५० ग्रॅम चरस जप्त करण्यात आले होते. त्यांना ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या मोहमद रईस हानिफ अन्सारी (वय ४७. रा. कुर्ला, मुंबई) यास विरार कोपरी येथून अटक करण्यात आली. त्याने त्याला कुर्ला येथील मोहम्मद आमीर अमनतुल्लाह खान हा एमडी ड्रग्ज पुरवित असल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी त्यालाही अटक केली.

अटक आरोपी मोहम्मद आमीर खान याने त्याच्या ओळखीचा मनोज पाटील उर्फ बाळा हा इसम त्यास एमडी ड्रग्ज पुरवित असल्याचे सांगून हा इसम यापूर्वी गुजरात राज्यात ड्रग्जतस्करीत अटक असल्याचे सांगितले. मनोज पाटीलची अधिक माहिती घेतली असता तो लाजपोर जेल, गुजरात येथे न्यायबंदी असताना पॅरोलवर आल्यानंतर परत कारागृहात हजर न होता पळून गेला असल्याचे समजले तसेच तो कुठल्याही प्रकारे मोबाईल कॉल न करता इंटरनेट डोंगलचा वापर करून व्हॉट्सअ‍ॅप कॉलव्दारे संपर्क करीत असल्याचे आणि सतत राहण्याचे ठिकाण बदलत असल्याचे कळले.

पोलीस पथकाने अत्यंत कौशल्याने तांत्रिक तपास करून मनोज उर्फ बाळा लक्ष्मण पाटील (वय ४५, रा. पेण) यास ६ फेब्रुवारी रोजी खालापूर येथून ताब्यात घेऊन अटक केली. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी त्याचा साथीदार दिनेश देवजी म्हात्रे, (वय ३८, रा. पेण) याला अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींकडे तपास केला असता मनोज पाटील, त्याचा साथीदार दिनेश म्हात्रे व आमिर खान यांनी मिळून पेणमधील कलद गाव येथील एक फार्महाऊस भाड्याने घेऊन ड्रग्जची निर्मिती करून ते विक्री केल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, या फार्महाऊसच्या मालकास संशय आल्याने आरोपींनी त्या ठिकाणाहून ड्रग्ज निर्मिती करण्याचे साहित्य, रसायन हे तळोजा एमआयडीसी, वलप गाव (ता. पनवेल) येथे गाळा भाड्याने घेऊन तेथे नेऊन ठेवले होते. या ठिकाणी पुन्हा ड्रग्ज निर्मितीची तयारी आरोपी मनोज पाटील साथीदारांमार्फत करीत होता. आरोपींकडून एकूण ५५ लाख ७३ हजार रुपये किमतीचे ड्रग्ज, ५९ हजार रुपये किमतीचे साहित्य, २७ लाख रुपये किमतीचे रसायन तसेच गुन्ह्यात वापरलेली वाहने जप्त करण्यात आली असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# आई वडिलांची सेवा म्हणजेच पांडुरंगाची सेवा -देहूमहाराज मेंगाळ

**कर्जत : प्रतिनिधी**




आपल्या भावासाठी वडिलोपार्जित जमिनीचा तुकडा न मागणाऱ्या महिला भगिनी यांचा सन्मान करण्याचा पायंडा समाजासाठी अतिशय स्तुत्य आहे. त्यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ सुरू केलेली ही सेवा पांडुरंगाची सेवा आहे. त्यामुळे या उपक्रमाचे आचरण समाजाने केले पाहिजे. ज्यांनी आई वडिलांची सेवा केली त्यांनी साक्षात पांडुरंगाची भक्ती केली असे समजले जाते, असे मार्गदर्शन देहूमहाराज मेंगाळ यांनी केले.

नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात स्व. सुरेखा मधुकर खडे आणि माणिक हिरू पाटील यांच्या स्मरणार्थ महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या वेळी चाफेवाडी मठाचे प्रमुख देहूमहाराज मेंगाळ, परशुराम महाराज खंडवी, कीर्तनकार शिवराममहाराज तुपे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हभप नागो गवळी, विजयमहाराज पाटील, हभप लक्ष्मण हजारे, उर्मिला हजारे, कर्जत पंचायत समिती माजी सभापती वासंती राणे, हभप शांताराम धुळे, शंकर विरले, दत्तू विरले, सरपंच रमेश लदगेआदी व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात कीर्तनकार अ‍ॅड. ज्ञानेश्वरी घाटे यांनी प्रवचन सादर केले. समाजात आपल्या भावाकडून वडिलोपार्जित मिळकती मधील वाटा न मागणाऱ्या बहिणींचा सत्कार सोहळा झाला. त्यात भाग्यवंत महिलांमध्ये सीताबाई रामा पाटील, सुंदर किरण पाटील, रखमाबाई धुळे, लक्ष्मी धुळे, राजूबाई कोळंबे, द्रौपदी विरले, राधिका विरले, रतन, मनीषा बदे, सपना राणे, आशा ठोंगरे, अश्विनी ताम्हाणे, लक्ष्मी ठोंगरे, प्राची ठोंगरे, अश्विनी ठोंगरे, ज्योत्स्ना बदे, प्रिया डायरे, तारामती पाटील आदींचा सन्मान साडी चोळी देऊन करण्यात आला.

या वेळी करडे कुटुंबीयांचे वतीने भास्कर करडे, हरेश करडे, मीनाक्षी करडे आणि ज्योती करडे यांनी पुढाकार घेवून कार्यक्रम आयोजित केला होता. करडे कुटुंबीयातील पंढरीनाथ करडे,मंगेश करडे, सदानंद करडे, नंदू करडे, दत्तात्रय विरले यांनी सहकार्य केले.

# पावणे येथील कंपनीला आग



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई लगत असणाऱ्या ठाणे बेलापूर आद्योगिक पट्ट्यात पावणे येथील सी १५७ भूखंडावरील सुजन कंपनीच्या गोडाऊनमध्ये आग लागली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रासायनिक द्रव्य असलेले पिंप ठेवलेले होते. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच कोणी जखमी झाल्याचे आढळून आले नाही.

शनिवारी (दि. १७) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पावणे एमआयडीसीतील सुजन या कंपनीत आग लागली. ही आग कंपनीच्या मागील बाजूस असलेल्या गो डाऊन मध्ये आग लागली. या ठिकाणी रसायन भरलेले पिंप फुटू लागल्याने पाहता पाहता आगीच्या भक्ष्यस्थानी पूर्ण कंपनी पडली. या कंपनीला लागून असलेल्या महेक कंपनीला ही आगीची झळ बसली. आगी बाबत माहिती मिळताच पावणे, महापे, शिरवणे एमआयडीसी अग्निशमन दल दाखल झाले. मात्र आगीचे रौद्र रूप पाहता नवी मुंबई मनपा अग्निशमनचीही मदत घेण्यात आली आहे.

सध्या आग आटोक्यात आली असली तरी पूर्ण नियंत्रण मिळवणे आणि त्या नंतर कुलिंगचे काम रात्री उशिरापर्यंत चालेल, अशी माहिती उपस्थित अग्निशमन कर्मचाऱ्याने दिली.

# कर्जतपर्यंत एसी लोकल सुरू करा; प्रवाशांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

काही दिवसापूर्वी रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयी करिता एसी लोकल सुरू केल्या आहेत, परंतु एसी लोकल बदलापूर पर्यंत येत आहे. या एसी लोकल कर्जतपर्यंतसुद्धा सुरू कराव्यात, अशी मागणी कर्जतकर प्रवाशांनी केली आहे.



रेल्वे प्रशासनाने एसी लोकल सुरू केल्या आहेत. या लोकलला प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. या लोकल बदलापूर रेल्वे स्थानकापर्यंत चालवण्यात येत आहेत. या लोकलची सुविधा कर्जतच्या प्रवाशांनासुध्दा मिळावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगिलाल ओसवाल यांनी मध्य रेल्वे प्रशासनाकडे पत्र पाठवून विचारणा केली असता. कर्जत साठी एसी गाड्या सुरू करता येतील मात्र ज्या लोकल कर्जतसाठी आहेत. त्यातील लोकल एसी म्हणून सुरू करण्यात येतील. जादा लोकल गाड्या एसी लोकल म्हणून सुरू करण्यात येणार नाहीत. असे उत्तर दिले आहे.

असे केल्यास प्रवाशी वर्गामध्ये नाराजी उद्भवूनउद्रेक होऊ शकतो. रेल्वे प्रशासनाचे हे धोरण चुकीचे आहे. दोन लोकलमध्ये खूप वेळाचे अंतर आहे. त्या मधल्या वेळेत प्रवाशांच्या मागणीनुसार एसी लोकल सुरू केल्यास प्रवाशांची चांगली सोय होईल व रेल्वे प्रशासनाचे आर्थिक उत्पन्नही वाढेल. काही लोकल मध्ये एक - सव्वा तासाचे अंतर आहे. त्यामध्ये गर्दीच्या वेळी या एसी लोकल सुरू कराव्यात. अशी मागणी करण्यात येत आहे.

# पनवेल बारापाडा येथे रस्ता कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील बारापाडा येथील एक कोटी २२ लाख रुपयांचा निधूमधून करण्यात येणाऱ्या जोडरस्त्याच्या कामाचे भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. १७) भूमिपूजन झाले.



पनवेल आणि उरण तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या सातत्यापुर्ण पाठपुराव्यामुळे पनवेल आणि उरण मतदार संघातील अनेक विकासाच्या कामांसाठी मोठा निधी मंजूर होऊन नागरीकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार आमदार महेश बालदी यांच्या ग्राम विकास निधीतुन आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एक कोटी २२ लाख रुपयांच्या निधमिधून बारापाडा जोडरस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या कामाच्या भुमीपूजनावेळी आमदार महेश बालदी, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच शेखर कानाडे, माजी सदस्य प्रफुल पाटील, कर्नाळा विभागीय अध्यक्ष चंद्रकांत पाटील, कर्नाळा विभागीय उपाध्यक्ष गणेश पाटील, बुथ अध्यक्ष जितेंद्र पाटील, पनवेल तालुका भाजपचे उपाध्यक्ष विद्याधर जोशी, राजू पाटील, फयाज दाखवे, अजगर दाखावे, रिजवान दळवी, बारापाडा गाव अध्यक्ष उमेश पाटील, अमोघ ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# आडिवली, सिद्धी करवले तलावाचे होणार सुशोभीकरण

## अमृत अभियान २.० अंतर्गत पनवेल मनपाचा निर्णय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमृत अभियान २.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक शुक्रवारी (दि. १६) मंत्रालयात झाली. या बैठकीत पनवेल महापालिका क्षेत्रातील आडिवली, सिद्धी करवले या दोन तलावाच्या पुर्नज्जीवीत व सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली याआधी १४८.१५ कोटी रुपयांच्या महापालिकेच्या२९ गावाकरितांची पाणी पुरवठा योजना, २०७.५८ कोटी रुपयांच्या २९ गावाकरितांची मलनिःसारण योजना , ५०.३४ कोटी रुपयांच्या पनवेल शहरात १५.५० दललि क्षमतेचे मलनिः सारण केंद्र बांधणे, १३.७६ कोटी रुपयांच्या पिसार्वे तलाव पुर्नरज्जीवित करणे अशा केंद्र शासनाच्या अमृत अभियान अंतर्गत महापालिकेच्या एकूण रु.४१९.८३ कोटी रक्कमेच्या प्रस्तावास शासन निर्णयानुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. या सर्व कामांची निविदा प्रक्रिया करून ही कामे हाती घेण्यात आली आहेत.

अमृत अभियान २.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक दिनांक १६ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात संपन्न झाली.या बैठकीत पनवेल महापालिके अंतर्गत येणाऱ्या आडिवली तलावाच्या सुमारे १०.३९ कोटी रुपये खर्चाच्या पुनरुज्जीवीत व सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच पनवेल महापालिकेंतर्गत सिद्धी करवले तलावाच्या ८.४१ कोटी रुपये खर्चाच्या पुनरुज्जीवीत व सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

या कामांतर्गत आडिवली व सिद्धी करवले येथील तलावामधील गाळ काढुन तलाव सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे तलावातील पाणी स्वच्छ राहुन सभोवतालच्या रहिवाश्यांना एक उत्तम विरंगुळा केंद्र तयार होणार आहे. तसेच पर्यावरण स्वच्छ राहण्यास सुध्दा मदत होणार आहे.



**पनवेल : आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १४१व्या पुण्यतिथीनिमित्त उरणचे आमदार महेश बालदी यांनी शिरढोण येथील आद्य क्रांतिवीरांच्या स्मारकात विनम्र अभिवादन केले. या वेळी भाजप केळवणे जि.प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर उपस्थित होते.**

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांनी सातारा येथे मिळविले ज्ञानामृत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्‌स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पनवेल येथील अर्थशास्त्र विभाग आणि छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील अर्थशास्त्र विभाग, या स्वायत्त महाविद्यालय यांच्यातील सामंजस्य कराराअंतर्गत 'स्टूडेंट एक्सचेंज कार्यक्रमानिमित्त सिकेटी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातील सहा विद्यार्थी व एक प्राध्यापक यांनी १२ ते १५ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा महाविद्यालयात उपस्थित राहून अनेक बाबींची माहिती घेतली.



यामध्ये प्रामुख्याने महाविद्यालयातील दैनंदिन तासिका, विभागामार्फत राबविले जाणारे नाविन्यपूर्ण उपक्रम, अर्थशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम, परीक्षा मूल्यांकन पद्धती, महाविद्यालयाचे रोजगाराभिमुख उपक्रम, महाविद्यालयातील 'कमवा आणि शिका' योजना, विद्यार्थ्यांशी संवाद सत्रे, प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील व प्राचार्य, बॅरि.पी.जी. पाटील स्पर्धा परीक्षा केंद्रास भेट, Beauty and wellness Training Centre इत्यादी बाबतची माहिती या विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने जाणून घेतली. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांसाठी 'सातारा दर्शन' कार्यक्रम घडवून आणण्याचा योगायोग महाविद्यालयायाने केला. यामध्ये सज्जनगड, कास पठार, महाबळेश्वर या पर्यटन स्थळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी आनंद लुटला.

स्टूडेंट एक्सचेंज कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, कॉलेजचे प्राचार्य प्रा.डॉ.मोरे, उपप्राचार्य व विभागप्रमुख प्रा.डॉ. अनिल वावरे, मा.प्रा.इप्पर, मा.प्रा. सुतार, मा.प्रा. गुरव, मा. प्रा.सविता वावरे, मा.प्रा.श्रद्धा गंगावणे, प्रा.राठोड, प्रा.डॉ.माने–देशमुख, दशरथ जाधव यांच्या अथक परिश्रमातून हा कार्यक्रम यशस्वी झाला. स्टूडेंट एक्सचेंज कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चांगू काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रा.डॉ.एस.के. पाटील, अर्थशास्त्र विभागप्रमुख व मानव्य विद्या शाखाप्रमुख प्रा.डॉ.बी. एस.पाटील, महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ.बी.डी.आघाव, प्रा.के.एन.ढवळे, डॉ.के. बी. ढोरे, एच.एस.खरात यांनी विद्यार्थ्यांना जाण्यास व दोन्ही महाविद्यालयांमध्ये समन्वय साधला. निश्चितच हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि महाविद्यालयाच्या भविष्याकालीन यशस्वीतेसाठी उपयुक्त ठरेल.

हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# हरिग्रामजवळ कार उलटली

**पनवेल :** हरिग्राम वाघेऱ्याजवळ लहान ब्रिजवरून एक कार पहाटे कोसळून उलटल्याची घटना घडली आहे. यात कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती प्रत्यक्षदर्शिनी दिली.

पहाटेच्या सुमारास एक चारचाकी कार हरिग्राम वाघेराजवळील एका छोट्याशा पुलावरून नियंत्रण सुटल्याने खाली पडली. या दुर्घटनेत कारचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती प्रत्यक्षदर्शिनी दिली. ही कार मोहो येथील असल्याचे सांगितले जात आहे. ३० ते ३५ फूट कार खाली कोसळल्याने या कारचे प्रचंड नुकसान झाले आहे. यात कोणतीही जीवितहानी झाली नसून या अपघाताबाबत तालुका पोलीस ठाण्यात नोंद नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# रिक्षेच्या धडकेत एक जखमी

**पनवेल :** भरधाव कारची रिक्षाला धडक लागल्याची घटना उलवे येथे घडली. यामध्ये रिक्षाचालक जखमी झाला आहे. उलवे सेक्टर १६ येथे हा अपघात घडला. रिक्षाचालक रमेश माने हे उलवेकडे महिला प्रवासी घेऊन चालले होते. या वेळी कारने अचानक उजवीकडे वळण घेतले. यामुळे कारची रिक्षाला धडक बसून माने यांना दुखापत झाली. नागरिकांनी त्यांना रुग्णालयात नेले. उपचार घेतल्यानंतर पोलिसांत तक्रार केली असून गुन्हा दाखल झाला आहे.




**पनवेल : तालुक्यातील विचुंबे गाव येथे ब्रिजचे काम सुरू आहे. या कामाची पाहणी भाजप उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा माजी जि.प. सदस्य अमित जाधव, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, पाली देवद जि.प. विभागीय अध्यक्ष किशोर सुरते यांनी केली.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १७) माजी विद्यार्थी संघटना व जिमखाना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन केले होते.



जिमखाना विभागाने घेतलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीनी सहभाग घेऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले होते या सर्व विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी या पारितोषिक वितरण आरंभाचे आयोजन केले होते यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व क्रीडापटू अली तांबे, सुवर्णा कदम, रुद्रतेज शेटे या सर्वांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व बक्षीस देण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना त्यांच्या हस्ते पारितोषिके दिली तसेच त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन प्रा. अंकिता जांगीड व जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर यांनी केले तसेच दोन्ही समितीतील सर्व सदस्यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले.

# गव्हाण विद्यालयात वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण कोपर येथे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांची १४१ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आकर्षण म्हणजे इयत्ता दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले श्री वाकडीकर बी. एम. सर हे स्वतः शिरढोण गावचे रहिवासी आहेत. तसेच शिवकर उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान विषयाचे अध्यापक आहेत. आज त्यांनी व्यक्त केलेले मनोगत विद्यालयातील विद्यार्थ्यांना अतिशय स्फूर्तीदायक ठरले.



सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक जी.सी. गोडगे, ज्येष्ठ शिक्षक व लाईफ मेंबर आर. एस. भोईर तसेच डि.के. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पी.बी. पाटोळे, क्रीडा शिक्षक जे.जे. ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. ग्रंथपाल एम. ए. म्हात्रे यांनी श्रीफळ वाढवले.

हा कार्यक्रम इयत्ता पाचवी क च्या वर्गातर्फे आयोजित करण्यात आला होता यावेळी सर्व रयत सेवकांनी प्रतिमा पूजन करून आद्य क्रांतिवीरांना आदरांजली वाहिली. या वेळी इयत्ता पाचवी क च्या वर्गातर्फे वक्तृत्व स्पर्धा ही आयोजित करण्यात आल्या होत्या. याच्यात आरोही नाळे, स्मित मोकल, चिन्मयी घरत अशा अकरा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या वेळी मुख्याध्यापकांनी आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे तसेच वर्ग शिक्षकास व म्हात्रे मॅडम यांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना कायमस्वरूपी रुजावी यासाठी मार्गदर्शन केले.

# पनवेलमध्ये हळदीकुंकू समारंभात आरोग्याचे वाण; वर्षा ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : वार्ताहर**

आबासाहेब बेडसे चॅरिटेबल ट्रस्ट, लाईफ लाईन हॉस्पिटल पनवेल आणि इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला आगळावेगळा हळदीकुंकवाचा कार्यक्रम आरोग्याचे वाण देऊन साजरा करण्यात आला

या समारंभाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सुविद्या पत्नी वर्षा ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुविद्या पत्नी नेहा देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सुविद्या पत्नी अर्चना ठाकूर, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, सामाजिक कार्यकर्त्या माधुरी गोसावी, लाईफ लाईन हॉस्पिटलच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. जयश्री पाटील, लाईफ लाईन हॉस्पिटलच्या डायरेक्टर स्त्रीरोगतज्ञ डॉक्टर केतकी पाटील म्हस्के, हॉस्पिटलच्या डायरेक्टर डॉक्टर जानवी पाटील, कल्पना नागावकर, वृषाली सावळेकर, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या प्रेसिडेंट सई कांडपिळे, परभणी महापालिकेच्या माजी नगरसेविका डॉ. विद्या पाटील या सर्वांनी दीपप्रज्वलन करून हळदी कुंकूच्या निमित्ताने आरोग्याचे वाण या कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

हळदीकुंकूच्या कार्यक्रमांमध्ये जे आरोग्याचे वाण देण्यात आले त्यामध्ये २५० महिलांच्या आरोग्य तपासणी केल्या गेल्या त्यामध्ये बीएमडी म्हणजेच शरीरातील कॅल्शियमचे तपासणी, हिमोग्लोबिन, रक्तातील लोहच प्रमाण, रक्तातील साखर, ब्लड प्रेशर, वेट, बी एम आय, अशा अनेक टेस्ट करण्यात आला करण्यात, असा हा आगळावेगळा हळदीकुंकवाचा कार्यक्रम आरोग्याचे वाण देऊन साजरा करण्यात आला, या कार्यक्रमांमध्ये पनवेलमधील अनेक प्रतिष्ठित महिलांनीसुद्धा सहभाग घेतला होता तसेच पनवेलच्या लाईफ लाईन हॉस्पिटलच्याच्या सर्व महिलांनी त्याचा आनंद लुटला, या हळदीकुंकूमध्ये महिलांनी नटून थटून सजून आलेल्या महिलांनी सेल्फी पॉईंट वरती आपले फोटो काढून आनंद द्विगुणीत केला असा हा हळदीकुंकाचा आगळा वेगळा आरोग्याचे वाण देऊन कार्यक्रम लाईफ लाईन हॉस्पिटल येथे साजरा करण्यात आला.



**रणधीर कपूरला एक पिढी पृथ्वीराज कपूरचा नातू, राज कपूरचा मोठा मुलगा, शम्मी कपूर व शशी कपूरचा पुतण्या, बबिताचा नवरा, ऋषि कपूर व राजीव कपूरचा मोठा भाऊ अशा नातेसंबंधाने ओळखत असे. नव्वदच्या दशकातील चित्रपट रसिक बेबो (करिश्मा कपूर) व लोलो (करिना कपूर) यांचे पिता म्हणून ओळखू लागली. मग सैफ अली खानचे सासरे ही त्याची ओळख झाली. आजची डिजिटल पिढी रणधीर कपूरला तैमूरचे आजोबा म्हणून ओळखते...**



## रणधीर कपूर

# धसमुसळ्या नायक, हुशार दिग्दर्शक



**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक


आज रणधीर कपूर याच कपूर खानदानाचा कुटुंब प्रमुख आहे. अनेक सुखदुःख पचवत पचवत १५ फेब्रुवारी रोजी वयाचा ७७वा वाढदिवस साजरा केला. शुभेच्छा! वडिलोपार्जित अशा चेंबूर येथील आर.के. स्टुडिओ या भव्य दिमाखदार वास्तूची विक्री आणि मग पाडाव, लहान सख्ख्या भावांच्या मृत्यूचा आघात, चेंबूर येथील आपल्या मागील पिढीपासूनच्या आर.के. कॉटेज या प्रशस्त घर वास्तूची विक्री आणि मग त्याचाही पाडाव असे अनेक धक्के पचवत रणधीर कपूरची वाटचाल सुरू आहे.


अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक हे त्याचे हिंदी चित्रपटसृष्टीतील रूप. राज कपूरचा मुलगा म्हणून तो लहानपणापासून फार लाडात, श्रीमंतीत वाढला. याबाबतच्या कथा दंतकथा काहीही असू देत. खुद्द रणधीर कपूरने (ज्याला कुटुंबात व चित्रपटसृष्टीत डब्बू कपूर म्हणतात) आपल्या एका मुलाखतीत म्हटलंय, लहानपणापासून शाळेत बेस्ट बसने जायचो यायचो. सरकारी वाहनाने त्याने त्या काळात वाटचाल केली. विशेषतः झुक गया आसमान या चित्रपटाच्या वेळेस दिग्दर्शक लेख टंडन यांच्याकडे चौथ्या क्रमांकाचा सहाय्यक दिग्दर्शक असताना चेंबूरपासून मुंबईतील अनेक स्टुडिओत बेस्ट बसने प्रवास केला. याचं कारण जनसामान्यांच्या जगण्याची कल्पना यावी आणि राज कपूरचा मुलगा म्हणून आपण कोणतेही शौक करू अशी भावना नको. लेख टंडन यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून वाटचाल करताना चित्रपटसृष्टी आणि चित्रपट माध्यमाचा त्याने बराच अनुभव घेत घेत स्वतःची जडणघडण केली आणि मग जीत या चित्रपटातून नायक म्हणून कारकीर्द सुरू केली. पहिलीच नायिका बबिता. तीच कालांतराने त्याची पत्नी झाली.

रणधीर कपूरच्या कारकिर्दीतील एक सुपर हिट चित्रपट मनमोहन देसाई दिग्दर्शित रामपूर का लक्ष्मण. आता दिग्दर्शक मनमोहन देसाईंचा 'पिक्चर' पाह्यला गेल्यावर तिकीट काढताक्षणीच तिकीट खिडकीवर आपला 'मेंदू' जमा करावा, डिपॉझिट करावा तर आणि तरच पडद्यावर जे जे काही चाललंय याचा मनसोक्त, मनोरंजन होईल. तसे न करता का, कसे, कशाला, केव्हा असे प्रश्न करीत बसलात, तर आनंदाला मुकाल या माझ्या मताशी फिल्म दीवाने नक्कीच सहमत होतील. (रूपेरी पडद्यावरील मनजींच्या मनोरंजनाला 'पिक्चर' हाच शब्द योग्य आहे. तळागाळातील लोकांपर्यंत त्यांचे पिक्चर पाहिले गेले.)

अशा मनजींच्या रामपूर का लक्ष्मण या चित्रपटाने मुंबईत शालिमारमध्ये खणखणीत रौप्य महोत्सवी यश संपादले. या पिक्चरमधील काही मारधाड दृश्ये याच शालिमार थिएटरच्या कार पार्किंगमध्ये चित्रीत करण्यात आली याचे त्या काळात विशेष वाटायचे.

त्या काळात अशा सर्व प्रकारचा मसाला मिक्स असलेले पिक्चर भारी चालत. मनजी म्हटलं की हरवले गवसले हे हुकमी मध्यवर्ती सूत्र. म्हणजे पिक्चरच्या पहिल्याच रिळात




लांब पल्ल्याच्या ट्रेनच्या प्रवासात हरवणे. पिता आणि एक मुलगा एकीकडे, आई दुसरीकडे तर दुसरा मुलगा तिसरीकडे असा प्रकार. एका मुलाचे नाव राम (मोठेपणी तो शत्रुघ्न सिन्हा होतो.) त्याचा भाऊ लक्ष्मण (अर्थात तो रणधीर कपूर होतो.) राम मुंबईत वाढतो, तर लक्ष्मण रामपूर गावात लहानाचा मोठा होतो आणि मग मुंबईत येतो. येथे त्याची भेट श्रीमंत घरातील रेखा चौधरी (अर्थात रेखा) हिच्याशी होते. ती लक्ष्मणच्या सरळ स्वभाव आणि साधेपणावर फिदा होते. (हे त्या काळातील पिक्चरमध्ये हमखास घडायचे. ते पाहून माझ्यावर असा परिणाम झाला की मोठेपणी आपणही असेच साधे सरळ राहावे, एखादी रेखा भेटेल असे वाटले, पण मी मोठा होईपर्यंत परिस्थितीत बदल झाला.) या पिक्चरमध्ये खूनाचा आळ, समज, गैरसमज, योगायोग वगैरे वगैरे लहान मोठ्या गोष्टी खूप घडतात. का घडतात हे विचारायचे नाही. तसा प्रश्न पडेपर्यंत पिक्चर पुढे जातो आणि तेच तर महत्त्वाचे आहे. मनजींच्या पिक्चरमधून हेच तर अपेक्षित असते. त्यातच मनमोहन कृष्ण पित्याच्या तर सुलोचनादीदी आईच्या भूमिकेत ही निवड अगदी परफेक्ट. दोन्ही व्यक्तीरेखा भरपूर सहानुभूती मिळवतात. इतर भूमिकेत रणजीत, रूपेशकुमार, तिवारी, पद्मा खन्ना, रमेश देव, विजू खोटे, केशव राणा वगैरे वगैरे. मनमोहन देसाईंच्या चित्रपटात सर्व प्रकारच्या व्यक्तीरेखा हमखास असत. रणधीर कपूर, रेखा, शत्रुघ्न सिन्हा आणि रणजीत या चौघांच्याही कारकिर्दीचा हा अगदीच सुरुवातीचा काळ होता. हे आज पिक्चर एन्जॉय करताना लक्षात येईल. रणधीर कपूरवर शम्मी कपूरचा प्रभाव जाणवतो. (तो कायमच जाणवत राहिला) रेखा नेहमीच गॉसिप्स मॅगझिनमधून थेट या चित्रपटाच्या सेटवर आली असे दिसते. शत्रुघ्न सिन्हा बोलण्यात दिसण्यात जास्त ओव्हर स्टाईलीश वाटतो. प्रत्येकाचे तोपर्यंत तीन चार चित्रपट झाले असतील. मनजींकडे तोपर्यंत दशकभरचा अनुभव होता. मजरूह सुल्तानपुरी यांच्या गीताना राहुल देव बर्मनचे संगीत. एकूण सातपैकी तीन गाणी आजही लोकप्रिय आहेत. गुम है किसी के प्यार मे (पाश्वगायक लता मंगेशकर आणि किशोर कुमार), प्यार का समय है जहा (लता मंगेशकर आणि किशोर कुमार), रामपूर का बासी हू मै (किशोर कुमार) ही गाणी कितीही वेळा ऐकावीत, पहावीत जराही कंटाळा येत नाही तर मग आणखी काय हवे? रणधीर कपूर या तीनही गाण्यात मस्तच खुललाय. राज कपूरकडे असलेला चित्रपट गीत संगीताचा सेन्स रणधीर कपूरमध्येही आला.

पिक्चर हिट झाल्यावर रणधीर कपूरकडे अशाच भाबड्या ग्रामीण नायकाच्या भूमिका मोठ्याच प्रमाणावर आल्या. प्रयाग राज दिग्दर्शित 'पोंगा पंडित'मध्ये त्याने ती साकारली. याच साच्याच्या भूमिकेने आपलं कलाकार म्हणून बरेच नुकसान झाले ही रणधीर कपूरची भावना.

फर्स्ट रननंतर मॅटीनी शोला माझ्यासारख्या फिल्म दिवान्याने हा पिक्चर पुन्हा पुन्हा एन्जॉय केला. 'रामपूर का लक्ष्मण' पन्नाशीपार कधी झाला हे समजलेच नाही हेच मोठे यश.

रणधीर कपूरने आपल्या अभिनयाची सुरुवात श्री ४२० चित्रपटात बालकलाकार म्हणून केली. १९७१च्या 'कल आज और कल'च्या वेळेस रणधीर कपूर यांनी या चित्रपटाद्वारे चित्रपट दिग्दर्शनाच्या क्षेत्रातदेखील पाऊल ठेवले. त्या काळात या गोष्टीचे विशेष कौतुक झाले. चित्रपटात पृथ्वीराज कपूर, राज कपूर आणि रणधीर कपूर या तीन पिढ्यांनी अभिनय केला होता आणि बबिता नायिका होती. तिला दिग्दर्शन करता करता रणधीर कपूरच्या तिच्या प्रेमात कसा पडला हे त्यालाही समजले नाही आणि तिने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने हे लग्न अतिशय थाटामाटात झाले.

रणधीर कपूरने धरम करम (१९७६) आणि हीना (१९९१) या चित्रपटांचे दिग्दर्शन केले. 'धरम करम'च्या सेटवरील रेखाच्या मोकळ्या वागण्याचे किस्से गॉसिप्स मुख्य रंगवून खुलवून आले. 'हीना' राज कपूरचे दीर्घकालीन स्वप्न होते. दोन गाण्यांच्या ध्वनिमुद्रणानंतर राज कपूरचे निधन झाल्यानंतर रणधीर कपूरने हे आव्हान स्वीकारून यशस्वी केली. ऋषि कपूर व झेबा बख्तियार यांच्यासह अश्विनी भावेला अतिशय उत्तम संधी मिळाली. कपूर बंधूंशी तिचे कायमस्वरूपी चांगलेच संबंध निर्माण झाले.

सत्तर ऐंशीच्या दशकात रणधीर कपूरने जवानी दिवानी, हाथ कि सफाई, रामपूर का लक्ष्मण, ढोंगी, खलिफा, कच्चा चोर, कल आज और कल, पोंगा पंडित, कस्मे वादे, बिवी ओ बिवी, भंवर, हरजाई, हमराही, चाचा भातीजा,राम भरोसे,आज का महात्मा, लफंगे, खलिफा आखरी डाकू, पुकार, कस्मे वादे इत्यादी चित्रपटातून भूमिका साकारल्या. रोझ मुव्हीज या चित्रपट निर्मिती संस्थेचे निर्माता व दिग्दर्शक रमेश बहेल यांच्याशी 'जवानी दीवानी'पासूनच रणधीर कपूरची खास मैत्री. त्यातील गाणी आजही लोकप्रिय.

'सामने ये कौन आया दिल में हुई हलचल' (पार्श्वगायक किशोरकुमार), 'नही नहीं कभी नहीं करो थोडा इंतजार' (आशा भोसले आणि किशोरकुमार), 'अगर साज छेडा तो तराने बनेंगे' (आशा भोसले आणि किशोरकुमार), जा ने जा ढूंढता मै यहाँ (आशा भोसले आणि किशोरकुमार), यह जवानी है दीवानी (किशोरकुमार) रमेश बहेल निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन नरेन्द्र बेदी यांचे आहे, तर गाणी आनंद बक्षी यांची असून तरुण संगीत राहुल देव बर्मनचे आहे. 'जवानी दीवानी'ने मुंबईत जमुनामध्ये रौप्यमहोत्सवी यश संपादले. आणि सत्तरच्या दशकात मॅटीनी शो आणि रिपीट रनला 'जवानी दीवानी' पुन्हा पुन्हा थिएटरमध्ये आला तेव्हा त्याची गाणी मुख्य आकर्षण होते.

'जवानी दीवानी' म्हणजे म्युझिकल हिट प्रेमपट. नावातच सगळे काही आले. विशेष म्हणजे रणधीर कपूर आणि जया भादुरी अशी यात रोमॅन्टीक जोडी. वेगळी वाटते ना? (तोपर्यंत ती जया बच्चन झाली नव्हती.) राजेश खन्नाच्या सुपर स्टार क्रेझने वातावरण ढवळून काढल्याचा तो काळ आणि त्यात आपला चित्रपट यशस्वी ठरणे इतर नायकांनाही महत्त्वाचे होते.

चित्रपटाच्या जगात यश हेच चलनी नाणं असल्याने ते हवेच असते. 'जवानी दीवानी'च्या खणखणीत यशाने ते रणधीर कपूरला दिले. निर्माते रमेश बहेल आणि दिग्दर्शक नरेंद्र बेदी यांनी याच जोडीला घेत 'दिल दीवाना' आणला, पण तो रसिकांनी नाकारला.

रमेश बहल यांनी काही वर्षांनी चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि कस्मे वादे (अमिताभ बच्चन, राखी, रणधीर कपूर, नीतू सिंग), हरजाई (रणधीर कपूर आणि टीना मुनिम), पुकार (अमिताभ बच्चन, झीनत अमान, परवीन बाबी, रणधीर कपूर) इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. रणधीर कपूर त्यांचा फेव्हरेट होता. 'जवानी दीवानी'पासून त्यांची मैत्री जमली होती...

ऐंशीच्या दशकात रणधीर कपूरने चित्रपटातून भूमिका साकारणे जवळपास थांबवले. कालांतराने सावनकुमार दिग्दर्शित 'मदर' (१९९९) या चित्रपटात त्याने आवर्जून भूमिका साकारलीय. रेखासोबत अनेक वर्षांनी काम करण्याचा योग आल्याने तो सुखावल्याचे फिल्मीस्तान स्टुडिओतील या चित्रपटाच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी गेलो असता 'लाईव्ह' अनुभवले. त्याने आपल्या कुटुंबाच्या आर.के. फिल्म बॅनरखालील 'प्रेम रोग' (१९८२), राम तेरी गंगा मैली (१९८५), प्रेम ग्रंथ (१९९६) आणि 'आ अब लौट चले' (१९९९)च्या निर्मितीत मन रमवले.

रणधीर कपूरच्या भेटीची एक विशेष आठवण सांगायलाच हवी. 'हीना'चा मुंबईवरील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा खेळ आर.के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये आयोजित केला होता. त्यानंतर खास आर.के. शैलीची झक्कास पार्टीही होती. रणधीर कपूर यजमान म्हणून आम्हा प्रत्येकाला भेटला. गप्पांच्या ओघात तो म्हणाला, माझ्या डॅडीच्या मेरा नाम जोकर चित्रपटाला सगळेच फ्लॉप म्हणतात, पण रिपीट रन, छोट्या पडद्यासाठीचे हक्क यातून या चित्रपटाने अशी काही कमाई केली की, आमच्या आर.के. फिल्म बॅनरखालील तो सर्वाधिक सुपर हिट चित्रपट ठरलाय. रणधीर कपूरचे हे बोल आजही माझ्या कानात घुमताहेत.

रणधीर कपूर राज कपूरचा मोठा मुलगा ही त्याची पहिली ओळख, आज तो कपूर खानदानाचा कुटुंब प्रमुख आहे. एका मोठ्या वर्तुळात रणधीर कपूरचा प्रवास सुरू आहे.

# मराठा समाजासाठी शासनाच्या विविध योजना अन् भरीव निधीचा दिलासा

राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात असलेल्या मागणीच्या अनुषंगाने इतर समाजाप्रमाणेच मराठा समाजासाठीदेखील विविध योजना राबविण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. त्या अनुषगाने गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध योजनांमुळे मराठा समाजास मोठा दिलासा मिळाला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांसाठी भरून निधी उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये शिक्षणाच्या योजनांना सर्वाधिक प्राधान्य दिले असल्याने मराठा समाजातील नवी पिढी घडण्यास निश्चितच मदत होणार आहे. शासनाकडून या योजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी होत असल्याने मराठा समाजाकडून शासनाबद्दल धन्यवाद देण्यात येत आहेत.

या योजनांमध्ये प्रामुख्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत वैयक्तिक आणि गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत ७४ हजार ८७३ लाभार्थ्यांना पाच हजार ६५९ कोटी बँक कर्ज मंजूर त्यावरील ६०८.१२ कोटी रूपयांचा व्याज परतावा वितरित करण्यात आला आहे. महामंडळाकडून ३५ गट प्रकल्पांना ३.३५ कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे. सारथी संस्थेचे पुणे येथील मुख्यालय इमारत आणि सहा विभागीय कार्यालये आणि लातूर व कोल्हापूर येथील उपकेंद्र तसेच ५०० मुले आणि ५०० मुलींच्या वसतिगृहासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिली. बांधकामासाठी एक हजार १८८.८२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह



योजनेंतर्गत तीन लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना एक हजार २९३ कोटी निर्वाह भत्ता वितरित करण्यात आले आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७ लाख ५४ हजार ४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी एक हजार २६२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. छत्रपती राजाराम महाराज सारथी गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी मागील वर्षी ३२ हजार ६३९ विद्यार्थ्यांना ३१ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत तसेच यावर्षी ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

मराठा समाजाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात प्रथमच या योजनाचा लाभ मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या स्वाधार योजनेच्या धर्तीवर निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष ६० हजार महानगराच्या ठिकाणी रुपये ५१ हजार विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी, रुपये ४३ हजार जिल्ह्याच्या ठिकाणी आणि रुपये ३८ हजार तालुक्याच्या ठिकाणी निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे वितरीत करण्यात येणार आहे.

मराठा आरक्षण कायदा सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्यामुळे शासकीय सेवेत निवड होऊन नियुक्ती न मिळालेल्या एक हजार ५५३ उमेदवारांची अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

विविध न्यायालयीन प्रकरणात कोविड–१९मुळे नोकरभरती प्रक्रिया रखडलेल्या उमेदवारांसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन एमपीएससी व अन्य शासकीय सेवेत तीन हजार २०० उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. एसईबीसीमधून इडब्ल्यूएस व खुल्या प्रवर्गाचा विकल्प देऊन उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा ऐतिहासिक निर्णय अशा प्रकारे एकूण चार हजार ७०० उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली.

सारथीकडून मागील तीन वर्षात प्रशिक्षण घेतलेल्या ५८ विद्यार्थ्यांची यूपीएससी (१२ आयएएस, १८ आयपीएस, आठ आयआरएस, एक आयएफएस, दोन भारतीय वन सेवा, पाच सीएपीएफ व इतर सेवा १२), तर ३०४ विद्यार्थ्यांची एमपीएससीमार्फत निवड झाली आहे. सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत (पीएचडीकरिता) मराठा समाजाच्या दोन हजार १०९ विद्यार्थ्यांना ११६.३४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहे. इडब्ल्यूएस अंतर्गत १० टक्के आरक्षणातून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये ३१ हजार विद्यार्थ्यांपैकी ७८ टक्के मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश तसेच एमपीएससीमार्फत शासकीय सेवेत ६५० उमेदवारांपैकी ८५ टक्के मराठा समाजाच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सारथीमार्फत ३६ हजार ७२६ विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विविध योजना राबवताना त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याबाबत सातत्याने आढावा घेत असतात. त्यामुळे विविध योजनांच्या अंमलबजावणीत गती निर्माण झाली आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला आहे. या अनुषंगाने कायद्याच्या चौकटीत टिकणारे व इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजास आरक्षण देण्याच्या दृष्टिने चर्चा करण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे.

**–राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# शाश्वत सिंचन, टंचाईमुक्तीसाठी जलयुक्त शिवार अभियान २.०

महाराष्ट्रात अलिकडच्या काही वर्षात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा परिणाम कृषी क्षेत्रावर होतो असे आढळून आले आहे. राज्यातील अवर्षणप्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती, हलक्या व अवनत जमिनीचे मोठे प्रमाण, अनिश्चित व खंडित पर्जन्यमान यामुळे कृषी क्षेत्रात वाढत जाणारी अनिश्चितता या बाबी विचारात घेऊन टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान २०१५–१६ ते २०१८–१९पर्यंत राबविण्यात आले.


जलयुक्त शिवार अभियानामध्ये एकात्मिक पद्धतीने ग्रामस्थ, शेतकरी व सर्व संबंधित विभागाच्या समन्वयाने शिवार फेरी करून नियोजनबद्ध रित्या कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी करणे यामुळे हा कार्यक्रम एक लोकचळवळ झाली आहे. विविध मृद व जलसंधारणाचे क्षेत्रीय उपचार व ओघळ नियंत्रण उपचार, जुन्या उपचारांचे बळकटीकरण, आवश्यकतेनुसार दुरुस्ती, गाळ काढणे इत्यादी कामे/उपचार एकूण २२ हजार ५९३ गावात मोहीम स्वरूपात राबवून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यामध्ये सहा लाख ३२ हजार ८९६ कामे पूर्ण झाली असून २० हजार ५४४ गावे जल परिपूर्ण झाली आहेत. अभियानांतर्गत झालेल्या कामामुळे जवळपास २७ लाख टीसीएम पाणीसाठा साठवण क्षमता निर्माण करण्यात येऊन ३९ लाख हेक्टर शेतीसाठी संरक्षित सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्यात येऊन कृषी उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणण्यात आली.

जलयुक्त शिवार अभियान २.०मध्ये क्षेत्र उपचार कामे यामध्ये कंपार्टमेंट बंडिग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर, मजगी, अनघड दगडी बांध, शेततळे, जुनी भात शेती बांध दुरुस्ती, शेतबांध दुरुस्ती जुन्या बोडीचे नूतनीकरण/खोलीकरण इत्यादी तसेच नाला उपचार कामे यामध्ये सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, गॅबियन बंधारा, वळण बंधारा, रिचार्ज शाफ्ट इत्यादीचा समावेश आहे.

या योजनेमध्ये ५७०० गावांची निवड करण्यात आलेली असून प्रस्तावित कामांची एकूण संख्या एक लाख ५७ हजार १४२ आहे. प्रस्तावित आराखड्याची प्रशासकीय मान्यता किंमत ४४१२ कोटी रुपये आहे.

जलयुक्त शिवार अभियानाप्रमाणे जलसंधारणासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम), आदर्श गाव अशा काही योजना राबविल्या गेल्या. जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यश लक्षात घेता राज्य शासनाने जलयुक्त शिवार अभियान २.०चा दुसरा टप्पा ३ जानेवारी २०२३ रोजी शासन निर्णयानुसार सुरू केला आहे, ज्यामध्ये पाणलोट विकास उपक्रमांच्या विविध कामांचा समावेश आहे. यामुळे पावसावर आधारित शेतीच्या समस्या कमी होण्यास मदत होऊन शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यास सहाय्यभूत ठरणार आहे.

**–दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,



# महादेववाडी-तळाघर पूल धोकादायक

## कठडा बसवून दुरुस्ती करण्याची, विजेचे दिवे लावण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील प्रसिद्ध देवस्थान म्हणजे श्री तीर्थक्षेत्र स्वयंभू महादेव मंदिर तळाघर जवळपास असाणारा पुल याच पुलावरून अनेक वाड्या वस्तींना जोडणारा अरुंद असा पुल आहे. या पुलाचा कठडा नसल्याने गेल्या एक वर्षे भरात अनेक अपघात झालेले आहेत. पुला लगत मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती राहत आहे. बाजुला हायस्कूल असल्याने विद्यार्थीच्या व नागरिकांनाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित प्रशासन विभागाने या पुलावर लवकरात लवकर कठडे, दुरुस्ती व विद्युत दिवे बसविण्यात यावे, अशी मागणी विभागातील नागरिक वर्गातून केली जात आहे.





दरम्यान, पुलाचे बांधकाम जुने असुन या पुलावर ना लाईट, ना कठडे त्यामुळे अपघाताचे प्रमाण अधिक वाढले आहेत. अनेकदा पर्जन्यवृष्टी जास्त झाल्यामुळे नदी तुडुंब भरून वाहते अशा वेळी अंधारातून नदीचा अंदाज न आल्यामुळे नदित पडण्याची शक्यता असते. विशेष म्हणजे याच पुलावरून धाटाव औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक कंपनीत तळाघर, निवी, बोरघर येथील मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग, शाळा व कॉलेजमधील अनेक मुले या पुलावरून रोज ये जा करित असतातच.

नुकतीच बाजुला असलेल्या गावातील एक चिमुकली मुलगी सायंकाळी सायकल चालवत असताना तिचा तोल गेला, परंतु पुला बाजूला नागरिकांच्या सरंक्षण साठी असणारे कठडे नसल्याने ती मुलगी नदी पाण्याच्या कातळ भागावर कोसळ्यामुळे जबरदस्त मार लागला सुदैवाने काही सर्तक नागरिकांमुळे तिला तत्काळ जवळच्या दवाखान्यात नेण्यात आले, परंतु त्या मुलीला पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी मुंबईत हलविण्यात सांगितले असे अनेक अपघात याच पुलावर कठड्या अभावी झालेले आहेत. त्यामुळे अशी घटना पुन्हा घडु नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे.

तळाघर महादेववाडी येथील पुलांच्या दुरूस्ती कडे लक्ष घालायला संबंधित विभागाला वेळ नाही किंवा ते याकडे दुर्लक्ष करित आहेत. काहीही झाले असले तरी या या पुलांची सुविधा अभावी दुरावस्था झाली, हे मात्र खरे आहे. एखादी अप्रिय घटना घडण्यापुर्वी प्रशासनाने या प्रकरणात लक्ष घालून पुलाची दुरस्ती करून विद्युत दिवे, कठडे बांधून द्यावे, अशी मागणी लोक वर्गातुन होत आहे.

> **वर्षाच्या बाराही महिने याच पुलावरून दिवसा रात्री कामगार, शाळेतील मुले तसेच गृहीणी ये-जा करित असतात वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत वर्दळीच्या रस्ता म्हणून मानला जातो तसेच लगतच असणाऱ्या प्रसिद्ध तिर्थक्षेत्र असलेले महादेव मंदिर आहे ईथे यात्रा भरते त्याअनुषंगाने या पुलावर पुन्हा अपघात झाला तर प्रशासनाची जबाबदारी राहिल.**
>
> **-विठ्ठल मोरे,**
> **तळाघर ग्रामस्थ तथा बळीराजा फाऊंडेशन अध्यक्ष**

## श्रीवर्धन एसटी आगाराचे वेळापत्रक कोलमडलेलेच

### प्रवाशांना होतोय मनस्ताप



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन परिवहन आगाराचे वेळापत्रक नेहमीच कोलमडलेले असल्याचे पाहायला मिळते. अनेक लांब पल्ल्याच्या फेऱ्या नेहमीच उशिरा सुटताना दिसतात. याबाबत वाहतूक नियंत्रकांकडे चौकशी केली असता बस तयार नाहीये, ड्रायव्हर आला नाहीये, कंडक्टर आला नाही, थोड्याच वेळात सुटेल, अशी मोघम उत्तरे देण्यात येतात.

वास्तविक पाहता ज्या बस चालकाची किंवा वाहकाची ड्युटी ठराविक वेळेला लावलेली असते. त्याने आपल्या ड्युटीच्या १५ मिनिटे अगोदर आगारामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु चालक, वाहकांमध्ये शिस्त नसल्यामुळेच श्रीवर्धन परिवहन आगारातील बसेस उशिरा सुटत असल्याचे दिसून येते. तसेच अनेक वेळा बस मेंटेनन्स करून तयार नसल्यामुळे देखील उशिरा सुटत असल्याचे कारण सांगितले जाते. जर एखादी बस गाडी मुंबई किंवा पुणे येथून श्रीवर्धन आगारात आल्यानंतर तिची देखभाल व दुरुस्ती होणे गरजेचे असते, परंतु सदर बस केवळ पाण्याने धुऊन पुन्हा बस स्थानकामध्ये पुढील प्रवासासाठी पाठविली जाते. बस धुण्याचा प्रकार म्हणजे केवळ बाहेरून पाणी मारणे, एवढाच असतो. बसच्या आत मधील आसने अनेक वेळा धूळ बसलेली असतात. तर आसनांच्या खालीसुद्धा अनेक वेळा कचरा असल्याचे पाहायला मिळते.

बत्यामुळे आगारामध्ये काम करणारे कर्मचारी काम करतात की नाही यावर लक्ष कुणाचे? असा प्रश्न उपस्थित होतो. आगारातून सुटणाऱ्या बसेस अनेक वेळा अचानक रद्द करण्याचे प्रकार देखील घडत असतात. आज सकाळी श्रीवर्धन पुणे लातूर ही बस पाच वाजता चे टाइमिंग असतानादेखील पाच वाजून २५ मिनिटांनी श्रीवर्धन बस स्थानकातून सुटली. बस सोडताना सदर बसला लावण्यात आलेला फलक लातूर श्रीवर्धन हा आदल्या दिवशी बस घेऊन आलेली फलक तसाच होता.त्याला फिरवून श्रीवर्धन पुणे,बार्शी,लातुर चालकाने किंवा वाहकाने सदरचा फलक बदलण्याची तसदी देखील घेतलेली नव्हती. याबाबत श्रीवर्धनचे आगार व्यवस्थापक यांच्याकडे संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

**▮ दुरवस्थेकडे लक्ष देण्याची मागणी**

*गेल्या अनेक दिवसांपासून श्रीवर्धन अलिबाग ही अत्यंत जुनी बस फेरी पुन्हा सुरू करावी. म्हणून प्रवाशांनी अनेक वेळा मागणी केली आहे. तरीसुद्धा श्रीवर्धन परिवहन आगाराने ही बस सेवा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतलेला नाही. तरी पेण येथील वाहतूक नियंत्रक कक्षाने श्रीवर्धन आगारातील या दुरवस्थेकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.*

## नढाळ येथे भीषण अपघात; एअरबॅगमुळे जीवितहानी टळली

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जूना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर चौक पोलीस दूरक्षेत्र हद्दीतील नढाळ येथे होंडा सिटी आणि कंटेनरचा अपघात झाला, मात्र एअर बॅग उघडल्याने जिवीत हानी झाली नाही.



दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ नढाळ येथे कंटेनर (एमएच ०४/एचवाय ७२७७) मुंबई दिशेकडे जात असताना त्याची गती अचानक चढनिवर कमी झाल्याने त्याच्या मागे जोरदार गती असलेली होंडा कार (एमएच ०६/एझेड ४८९९) त्याला मागून धडकली, होंडा सिटीच्या मागे असलेली किया गाडी (एमएच ४६ सीएच ४०७३)ने अचानक ब्रेक दाबून गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला, पण तीची धडक होंडा सिटी ला बसली. होंडा सिटी आणि कंटेनर यांची ही धडक इतकी भयानक होती की होंडा सिटी चा पुढुन चक्काचुर झाला, मात्र गाडीतील एअर बॅग उघडल्याने जीवित हानी झाली नाही. हे कंटेनर लोखंडी कवॉईलची वाहतूक करतात असे समजते.

होंडा सिटी चालकाला किरकोळ जखम झाली आहे. चौकचे पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले, अपघातस्थळी मदतकार्य सुरू केले व झालेली वाहतूक कोंडी सोडवली. पुढील तपास चौक पोलीस करीत आहेत.

## आदिवासी तरुणांनी व्यवसाय करणे अभिमानास्पद -दरवडा

**कर्जत : प्रतिनिधी**

आदिवासी समाजातील तरुण नोकऱ्या शोधण्याची धडपड करीत असतात, मात्र कर्जत तालुक्यात आदिवासी समाजातील तरुण नोकऱ्याबरोबर व्यवसाय करण्यासाठी पुढे येत आहेत. ही समाजासाठी निश्चित अभिमानास्पद बाब असल्याचे मत कर्जत तालुका आदिवासी संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा यांनी व्यक्त केले.

नेरळ जवळील ढाकीचामाळ येथील आदिवासी तरुण संदीप चौधरी यांनी केश कर्तनालय सुरू केले. या वेळी परशुराम दरवडा, दत्तात्रेय सुपे, नितीन निरगुडा, दत्तात्रेय निरगुडा, हवालदार कुमरे, मनीषा रावजी शिंगवा, जयराम उघडा, जयवंत उघडा, मधुकर शिंगवा, विकास पारधी, गोमा निरगुडा, काशिनाथ निरगुडा, रामा ठोंबरे, बाळू पुंजारा, नामदेव चौधरी, तातू दरवडा आदी उपस्थित होते.

आदिवासी समाज बांधवाने व्यवसायाकडे लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन दरवडा यांनी केले.



## केएमसी महाविद्यालयात काव्यलेखन कार्यशाळा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या के.एम.सी. महाविद्यालयात 'मराठी भाषा व साहित्य मंडळ' व 'कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा खोपोली' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'कविता मनामनातली' या उपक्रमांतर्गत झालेल्या काव्यलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी पनवेलच्या कवयित्री व गझलकार ज्योत्स्ना राजपूत पाहुण्या म्हणून होत्या. 'कोमसाप' खोपोली शाखेच्या अध्यक्ष उज्वलाताई दिघे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांनी मराठी विभागात होत असलेल्या विविध साहित्यिक उपक्रमांचे कौतुक केले. महाविद्यालयीन काळातच विद्यार्थ्यांनी कला आणि साहित्याची सोबत करावी. त्यातून जीवनाची यशस्वी वाटचाल आपल्याला करता येईल, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.



(छाया : जयवंत माडपे)

ग्रंथभेट देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी 'कोमसाप' चे वामनराव दिघे, डॉ. सुभाष कटकदौंड, जयश्री पोळ, निशा दळवी, जनार्दन सताणे, सुरेश चव्हाण, विजय घोसाळकर, संतोष वाघ हे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी आपल्या कविता व गझल यावेळी सादर केल्या.

डॉ.सुभाष कटकदौंड यांनी आपल्या नव्याने प्रकाशित झालेल्या 'नवरा माझ्या मुठीत गं' (विनोदी काव्य संग्रह), 'माणुसकी हीच खरी जात'(एकांकिका), 'दोन पेग' (एकांकिका) या पुस्तकांच्या प्रती महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी भेट दिल्या. मराठी विभाग प्रमुख डॉ.भाऊसाहेब नन्नवरे यांनी प्रास्ताविक केले. प्रथमेश धायगुडे, समृद्धी मुसळे, प्रीती सिंग या विद्यार्थिनींनी कविता सादर केल्या. सृष्टी इंगोले हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला. मराठी विभागातील प्रा.ओंकार खंडागळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वर्षाराणी गोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या वेळी महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'सुजाण पालकत्वासाठी मॅजिक फॉर्म्युला नाही'

**मुरूड : प्रतिनिधी**

मुलांची जडणघडण ही आपसूक घडत नाही. मुले सातत्याने अनुकरण करीत असतात. आजच्या जीव घेण्या स्पर्धेच्या युगात मुलांना अधिक गुण मिळावेत यासाठी पालकांचा खटाटोप असला तरी गुणांचा बागुलबुवा उभा न करता त्यांच्या अभिरूची व अभिव्यक्तीचा विचार करावा पालकत्व ही एक साधना असुन सुजाण पालक होण्यासाठी कुठलाही मॅजिक फॉर्म्युला नसल्याचे प्रतिपादन सहकार भारतीचे रायगड जिल्हा मंत्री प्रा. मेघराज जाधव यांनी केले.



नचिकेता हायस्कूल, मुरूडतर्फे आयोजित फनफेअर व स्नेहसंमेलनाच्या बक्षिस वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर मुख्य विश्वस्त मुग्धा दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर प्रमुख अतिथी प्रा. मेघराज जाधव, शिघ्रे मराठी शाळेचे केंद्रप्रमुख संजय झिराडकर, विश्वस्त आराधना दांडेकर, प्राचार्य योगेश तंटक, शिक्षक -पालक संघाच्या उपाध्यक्षा तरन्नुम फराश, रायगड जि.प माजी सदस्य नम्रता कासार, शुभांगी तांबडकर निकिता सुर्वे, जाहिद कादिरी कोथवीलकर, लसने आदी उपस्थित होते .

प्रास्तविक करतांना प्राचार्य योगेश तंटक, संस्थेच्या विश्वस्त मुग्धा दांडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. फन फेअर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी व पालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रांगोळी 'टाकाऊतून टिकाऊ' पक्वान्न 'मेहंदी' वेशभुषा आदी स्पर्धांना मोठा प्रतिसाद मिळाला. शै. वर्षातील उत्कृष्ट खेळाडू म्हणून हितेश सुतार व समृध्दी दिवेकर तर उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून स्वरा मसाल 'ऑल राऊंड परफॉमर ऑफ द इअर म्हणून वेदांत दिवेकर' सुश्मिता दास यांना गौरवीण्यात आले. तर अर्जुन हाऊस प्रथम ' एकलव्य हाऊस द्वितीय व कर्ण हाऊस ला तृतीय क्रमांकाचा चषक देण्यात आला.

## पालीवाला महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

**पाली : प्रतिनिधी**

संत सेवालाल महाराजांनी मानवतावादी आणि समाज सुधारणेचे महान कार्य केले असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग यांनी केले. शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग म्हणाले की महाराष्ट्राच्या मातीला जसा शौर्य आणि पराक्रमाचा वारसा आहे तसाच महान संतांच्या विचारांचा गंध ही आहे. अनेक समाजसुधारक समाजाला दिशा देण्याचे कार्य करीत होते. असेच मानवतावादी कार्य संत सेवालाल महाराजांनी केले. समाजातील वाईट प्रथा, अनिष्ट रूढी चाली परंपरा, अज्ञान, जातीव्यवस्था समूळ नष्ट करण्यासाठी या संतांनी आपले जीवन समर्पित केले. संत सेवालाल महाराज बंजारा जातीत जन्माला आले असले तरी त्यांचे कार्य एका जाती धर्म समूहापुरते मर्यादित नव्हते. सर्व समाजाला योग्य मार्गाला घेऊन जाण्याचे महान कार्य त्यांनी केले.समाजातील भोळ्या समजुती, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सत्य अहिंसा, इत्यादी विषयी महान विचार त्यांनी सतत मांडले. सर्वसामान्य माणसाला आदर्श जीवन जगण्याचे सूत्र सेवालाल महाराजांनी दिले. त्यांचे विचार अधिकाधिक पुस्तकातून पुढे येणे काळाची गरज असल्याचे प्राचार्य लहुपचांग यांनी मनोगतात सांगितले. या वेळी पत्रकार धम्मशील सावंत, प्रा. सतू चव्हाण, प्रा. उमेश इनामदार यांनी देखील संत सेवालाल महाराज यांच्या जीवनपट व कार्यप्रणालीवर प्रकाश टाकला.

या वेळी प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग,प्रा. मधुकर बडगुजर, प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. अंकुश सोहनी,प्रा. ज्ञानेश्वर मुंढे, प्रा. यशवंत भांडकोळी, प्रा. उमेश इनामदार, भारती आरोटे, प्रा. सरिता देशमुख, जया मचीगर,प्रा. अपर्णा केदारी, प्रा. कृष्णा जांभेकर, प्रा. डॉ अनील झेंडे, प्रा. सतू चव्हाण, प्रा. भक्ती साजेकर आदींसह प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.



## ॲड. गायकवाड यांची नियुक्ती

**कर्जत : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट महाराष्ट्र प्रदेश युवक आघाडी, राज्य कार्यकारिणीमध्ये कर्जत तालुक्यातील कार्यकर्ते ॲड. उत्तम गायकवाड यांना प्रदेश युवक आघाडी मध्ये संघटक बनविले आहे. महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांनी ॲड. गायकवाड यांना नियुक्ती पत्र दिले. या वेळी युवक आघाडीचे राज्य सरचिटणीस डॉ. विजय मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या नियुक्तीमुळे डॉ. गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.

# चोरट्यांकडून पादचारी 'लक्ष्य'

## नवीन पनवेलमध्ये वृद्ध महिलेची चेन खेचून पोबारा

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल परिसरामध्ये पायी चालणाऱ्या व्यक्तींच्या गळ्यातील सोनसाखळी लुटणाऱ्या चोरट्यांची टोळी सक्रीय झाली आहे. गेल्या आठवड्याभरात एकाच दिवशी तीन जबरी चोरीच्या घटनेनंतर पुन्हा पायी चालणाऱ्या ७३ वर्षीय वृद्धेला लुटीचा सामना करावा लागला आहे.



खांदेश्वरमधील ४४ वर्षीय महिला सेक्टर १ मधील शिवकृपा अपार्टमेन्ट समोरील रस्त्यावर पाळीव श्वानाला घराबाहेर फीरवत असताना रात्री पावणेआठ वाजण्याच्या सुमारास चोरट्याने त्यांचे मंगळसूत्र हिसकावले. या महिला पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यावर त्यांना पोलीस ठाण्यात त्याच चोरट्यांनी अजून दोघांना लुटल्याचे समजले. त्यापैकी दुसऱ्या घटनेत सेक्टर ४ मध्ये राहणाऱ्या ४८ वर्षीय व्यक्तीच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी शिवा कॉम्पलेक्स येथे चोरली. तर तिसऱ्या घटनेत ३७ वर्षीय व्यक्तीला त्याच चोरट्यांनी पुमा शोरुमसमोरील रस्त्यावर लुटल्याचे पोलीस ठाण्यात समजले. या सर्व घटनांची एकत्रित नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

या घटनांनंतर खांदेश्वर आणि नवीन पनवेल परिसरात सर्व काही सुरळीत होईल असे वाटत असताना दोन दिवसांपूर्वी नवीन पनवेल येथील सेक्टर १९ येथे राहणाऱ्या ७३ वर्षीय वृद्ध महिला पायी चालत असताना एक चोरटा चालत येऊन त्याने वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून तेथून पोबारा केला. ही घटना सेक्टर १२ येथील रस्ता क्रमांक १६ येथे सकाळी साडेअकरा वाजता घडली आहे.

# नवी मुंबई महापालिकेने अर्थसंकल्पात करवाढ करू नये –आमदार गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने २०२४- २५च्या अर्थसंकल्पात पुढील पाच वर्षे कोणताही मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वाढवू नये, अशी सूचना आमदार गणेश नाईक यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सन २०२४-२०२५चा अर्थसंकल्प महापालिका लवकरच सादर करणार आहे. या अर्थसंकल्पात शहर विकास, सोयी-सुविधा आणि भविष्यकालीन गरजा पाहता आमदार गणेश नाईक यांनी मौलिक सूचना केल्या आहेत.



नवी मुंबई महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. लोकप्रतिनिधी मंडळ अस्तित्वात नाही. या पार्श्वभूमीवर आमदार गणेश नाईक यांनी वेळोवेळी नवी मुंबईकरांच्या हिताचे अनेक निर्णय प्रशासनाकडून मंजूर करून घेतले आहेत. आमदार गणेश नाईक यांच्या सूचनेनुसार नवी मुंबईकरांवर मागील २४ वर्षे कोणताही करवाढीचा बोजा लादण्यात आलेला नाही. मागील वर्षी प्रशासकीय काळातदेखील करवाढ करण्यात आली नव्हती. यापुढेही हा करदिलासा सुरू ठेवावा, अशी मागणी त्यांनी पालिका आयुक्ताकडे केली आहे.

नवी मुंबईची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. या लोकसंख्येला पुरेल इतका पाणीसाठा भविष्यात लागणार आहे. नवी मुंबईची भविष्यकालीन पाण्याची गरज भागवण्यासाठी भिरा हायड्रो एक हजार एमएलडी पाणी योजना आमदार गणेश नाईक यांनी सुचवली असून या योजनेसाठीदेखील बजेटमध्ये भरीव तरतूद करण्याची सूचना त्यांनी केली आहे.

शहरातील अंतर्गत दळणवळण उत्तम राहून सुरळीत वाहतुकीसाठी आमदार नाईक यांनी सिटी मोबिलिटी प्लॅनची संकल्पना मांडली होती. या योजनेची अंमलबजावणी सुरू असून या अंतर्गत शहरात आवश्यक ठिकाणी त्यांनी उड्डाणपूल बांधण्याची सूचना केली आहे. ऐरोली-कटाई उन्नत मार्गावर ठाणे-बेलापूरच्या दिशेने चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिकांचे निर्माण करण्यासाठी निधी राखीव ठेवण्याची सूचना केली आहे. त्याच बरोबर नाला व्हिजन अंतर्गत कामांना गती देण्यासाठी निधीची तरतूद करण्याची सूचना केली आहे. सर्वच नोडमध्ये सार्वजनिक रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र, माता बाल रुग्णालयांच्या निर्मितीसाठी निधी ठेवावा. महापालिका शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी भरीव निधी ठेवावा. अत्याधुनिक पद्धतीने घनकचऱ्याची व्यवस्था करण्यासाठी निधीची तरतूद करावी.

शहराला जोडणारा कोस्टल रोडसाठी निधी राखीव ठेवावा. कांडोनियम अंतर्गत कामे करण्यासाठी निधीची तरतूद करावी. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही योजना दोन प्रभावीपणे राबिण्यासाठी निधी राखीव ठेवावा, अशा मौलिक सूचना करून आमदार गणेश नाईक यांनी पालिकेचा आतापर्यंतचा कारभार आर्थिक शिस्तीचा राहिल्याने पालिकेला डबल ए प्लसचे आर्थिक मानांकन प्राप्त झाले आहे.

पुढील काळात मोठे प्रकल्प करताना डेफर पेमेंट आणि बॉण्ड्स या आर्थिक सोयीचा वापर करण्याचा सल्ला आमदार नाईक यांनी पालिका प्रशासनाला दिला असून यामुळे अर्थसंकल्पावर भार पडणार नाही.

## या बाबींसाठी निधीच्या तरतुदीची मागणी

उड्डाणपूल, अंडरपास, भुयारी मार्ग, उड्डाणपूल जोड मार्गिका, एस्केलेटर, सार्वजनिक रुग्णालय, नागरी आरोग्य केंद्र, माता-बाल रुग्णालय, नागरिकांचा विमा, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, अबॅकस शिक्षण, विद्यार्थ्यांसाठी सकस आहार, गणवेश, पुस्तके, टॅब, वैद्यकीय सोयी सुविधा, खेळाच्या मैदानांचा विकास, युवक प्रशिक्षण केंद्र, पाणीगळती थांबविण्याकरिता उपाययोजना, बटरफ्लाय गार्डन, फ्लेमिंगो सफारी, गवळीदेव, सुलाई देवी पर्यटनस्थळ विकास, डिस्कव्हरी गार्डन, प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना, कौशल्य विकास केंद्र, पार्किंग व्यवस्था, प्रवेशद्वाराची उभारणी, मत्स्यालयाची निर्मिती, ट्रांजिट कॅम्पची निर्मिती, जेष्ठ नागरिकांना नाममात्र दारात वैद्यकीय सेवा, वर्दळीच्या ठिकाणी स्कायवॉक, निराधार जेष्ठांसाठी वृद्धाश्रम, आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल, करियर मार्गदर्शन अभ्यासिका, इनडोअर स्टेडियमची निर्मिती, आगरी-कोळी भवन, वारकरी भवनची निर्मिती, विविध संत आणि महान व्यक्तींच्या नावे भवन निर्मिती, आदिवासी घरकुल योजना, नोकरदार महिलांसाठी पाळणाघर, झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी रात्र शाळा, पॅरामेडिकल आणि नर्सिंग कॉलेज, आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवाचे माहिति केंद्र, बचत गट उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी केंद्रांची उभारणी, नाका कामगारांसाठी निवारा, बेघरांसाठी रात्र निवारा केंद्र, इलेक्ट्रिक बसेस, हायड्रोजन फ्युएल बसेस खरेदी, महिला सक्षमीकरण योजना, लोककल्याणकारी योजना, महिला उद्योग केंद्र, नवीन रुग्णालये, गृहनिर्माण सोसायट्यांसाठी कचरापेटी पुरवठा योजना, पालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी वाशी डेपोच्या धर्तीवर अन्य डेपोचा विकास.

# नवी मुंबईत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान




**नवी मुंबई : बातमीदार**

नुकत्याच ३१ व्या राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेत विज्ञान प्रकल्प स्पर्धेमध्ये ३६ जिल्हयांतील ४५ हजारहून अधिक विदयार्थी प्रकल्पाची नोंदणी झाली होती. त्यामधून ३० प्रकल्पांची राष्ट्रीय स्तरावर निवड झालेली असून त्यामध्ये नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ४६, गोठीवली शाळेतील प्रिती राठोड व पल्लवी सोळंके या दोन विद्यार्थिनींनी साकारलेल्या अभिनव प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड झालेली आहे. त्याबद्दल या दोन्ही विद्यार्थिनींचा महापालिका मुख्यालयातील विशेष समारंभात महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

त्याचप्रमाणे गोठीवली शाळेतीलच अंश शर्मा व विलास गुरव या दोन विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'बहुउपयोगी खुर्ची' या प्रकल्पाची महापालिका स्तरावर महापालिका स्तरावर उत्तम प्रकल्प म्हणून निवड झालेली आहे. त्यांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले.

याशिवाय नवी मुंबई महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने विविध खेळांत नैपुण्य असणाऱ्या नमुंमपा शाळेतील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. यामधील रायफल शुटींग या ऑलिपिंक स्तरावरील मान्यताप्राप्त खेळाच्या प्रशिक्षण सुविधा केंद्रातून प्रशिक्षण घेऊन राज्यस्तरावर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या नुतन चौधरी व अंशिका प्रजापती या दोन नमुंमपा शाळेतील विद्यार्थिनींना त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल सन्मानित करण्यात आले.

# पिरकोन विद्यालयात शिवजयंती महोत्सव

**उरण : वार्ताहर**

उरण पूर्व विभागातील रयत शिक्षण संस्थेचे पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दहागाव विभाग येथे सोमवारी (दि. १९) सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या सोहळ्यास उरणचे आमदार महेश बालदी, सुधीर घरत, प्रा. डी. बी. पाटील, प्रा. आर. पी. ठाकूर, प्रा. एस. एस. फडतरे यांची उपस्थिती लाभणार असून उद्योजक प्रफुल्ल वेदक व रायगड भूषण जितेंद्र म्हात्रे, रायगड भूषण देवेंद्र पाटील यांच्या विशेष सत्कार करण्यात येणार आहे. असे कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन जीवन गावंड व प्राचार्य बल्लाळ मॅडम यांनी निमंत्रण पत्रकाट म्हटले आहे. तरी तमाम शिव भक्तांनी या सोहळ्यास आपली उपस्थिती दर्शवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# शिरवणे येथे माघी गणेशोत्सव साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट, शिरवणे आयोजित माघी गणेशोत्सव सोहळा ठाणे बेलापूर पंचक्रोशीतील पुरातन जागृत देवस्थान स्वयंभु श्री गणेश मंदिर, शिरवणे येथे मोठ्या उत्साहाने धार्मिक वातावरणत झाला.



या माघी गणेशोत्सव सोहळ्यात प्राचीन आणि पुरातन श्री गणेश मंदिरात पहाटे अभिषेक आणि महापूजा करण्यात आली. या वेळी विविध प्रासादिक भजन मंडळाने भजन सादर केली. बुवा रूपेश बुवा मढवी, कुमारी एकता भाग्यवंत, बुवा नंदकुमार सुतार, बुवा देवेंद्र पवार, बुवा निशिकांत ठाकूर बुवा पवनकुमार जाधव आदींचे सुश्राव्य भजन झाले. दुपारी माघी गणेशोत्सव निमित्ताने आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तगणांनी घेतला.

धार्मिक उत्सव सोहळा करण्यासाठी श्री गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव माजी महापौर जयवंत सुतार, अध्यक्ष नामदेव ठाकूर, प्रभाकर सुतार, दिलीप घरत यांनी मेहनत घेतली.

# तळवली गाव येथे ५० लाखांच्या विद्युतीकरण कामांचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील तळवली गाव येथे भाजपा आमदार रमेश पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात आलेल्या ५० लाख रुपयांच्या विद्युतीकरणाच्या विविध कामांचे लोकार्पण माजी नगरसेवक तानाजी पाटील व ॲड. चेतन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी सहदेव पाटील, लालचंद्र पाटील, नारायण म्हात्रे, तुळशीराम पाटील, रामदास पाटील, स्वप्निल पाटील, प्रमोद पाटील, संदीप पाटील, अविनाश पाटील, बळीराम पाटील, दीनानाथ पाटील, पेंटू पाटील, रघुनाथ पाटील, रामचंद्र पाटील, जयवंत पाटील, विनोद पाटील, प्रकाश पाटील, रोहिदास पाटील, धनाजी पाटील, भरत पाटील, वासुदेव पाटील, श्याम पाटील, प्रेमनाथ पाटील, महिंद्र पाटील, नवनाथ पाटील, पद्मनाथ पाटील, मंगेश पाटील, प्रणय पाटील आदी उपस्थित होते.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार आमदार पाटील यांनी या ठिकाणी नवीन रोहित्र उभारणे, नवीन उच्च दाब व लघु दाब वाहिनी व नवीन एल.टी. फिडर पिलर बसविणे या कामांकरिता सुमारे ५० लाखांचा निधी आपल्या स्थानिक विकास निधीतून मंजूर केला. तसेच स्थानिक ग्रामस्थ कै. महादेव सिताराम म्हात्रे यांच्या कुटुंबीयांच्या वतीने विद्युतीकरणाच्या कामाकरिता सदरची जागा मोफत देण्यात आली. या विद्युतीकरणाच्या कामांचा लोकार्पण सोहळा झाला.

या वेळी ॲड. चेतन पाटील यांनी सांगितले की, तळवली गावातील अनेक वर्षापासूनचा विद्युतीकरणाचा प्रश्न मार्गी लागला असून पुढील काळातही विजेचा व्यवस्थित पुरवठा होईल. त्याचप्रमाणे या परिसराचा सर्वांगीण विकास करण्याकरिता आमदार रमेश पाटील यांच्या माध्यमातून सर्व प्रयत्न केले जातील, असे आश्वासन यावेळी दिले.

# उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराच्या प्रवेशिका पाठविण्यासाठी मुदतवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वचछता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आलेली आहे.

या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम ३१ जानेवारी, २०२४ असा होता. या प्रवेशिका मागविण्याकरीता २९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

कोकण विभागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगरजिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचं नमुने dgipr.maharashtra.gov.in व www.maharshtra.gov.in तसेच https://mahasamvad.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# महिला दिनानिमित्त उर्जिता पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, पनवेलच्या वतीने राष्ट्रीय महिला दिनानिमित्त उर्जिता पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पनवेल परिसरातील सांस्कृतिक, वैद्यकीय, अध्यात्मिक, राजकीय, नाट्यक्षेत्र, ट्रेकिंग तसेच महापारेषण विभाग अशा विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मैत्रेयी दाबके, सुनिता खरे, डॉ. आरती मलिक, ज्योती देशमाने, कविता चौतमल, मीरा बेंडसुरे-एकबोटे, प्रिसीलिया मदन या सात महिलांना उर्जिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शेला, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र, मानचिन्ह, श्रीरामाची मूर्ती आणि पुस्तक भेट देऊन सत्कारमूर्तींना गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला जिजाऊ महिला मंडळाच्या अध्यक्षा, गाज फाऊंडेशनच्या सचिव कान्होजी आंग्रे घराण्यातील भैरवी रघुजीराजे आंग्रे अलिबाग, प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच पनवेलमधील विविध संस्थांचे मान्यवर सदस्य, पनवेल मधील शाळांचे मुख्याध्यापक, वीरनारी, संस्थेच्या सेवाकार्यात सोबत करणारे स्नेही, भाविप संस्थेचे प्रांताध्यक्ष महेश शर्मा व भीमजी रुपाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

विविध उपक्रम आणि कार्यक्रम आखून समाजाला नेतृत्व करणाऱ्या व प्रगतीच्या दृष्टीकोनातून कार्य करणाऱ्या व्यक्तिंची पारख करून त्यांना प्रेरणा, उर्जा देणारी सामाजिक संस्था आहे अशाप्रकारे भारत विकास परिषद पनवेल संस्थेबाबत कार्यक्रमात उपस्थितांनी अभिमानास्पद मत व्यक्त केले.

भाविप पनवेल अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र, सचिव पद्मजा कुलकर्णी, खजिनदार शितल विचारे, महिला संयोजिका आभा जांबेकर यांच्यासह सर्व सभासदांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.



# गुरुकुलमध्ये समावर्तन कार्यक्रम



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवी मुबंई येथील श्रीस्वामिनारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय शाळेत इयत्ता दहावीचा समावर्तन संस्कार कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सद्गुरू देवप्रसाद दासजी स्वामीजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की आपले जीवन मूल्य आहे, संस्कार पाहिजेत. गुरुकुलचे नाव आपल्यासारख्या विद्यार्थ्यांनी वाढवले आहे. पुढे ते म्हणाले, गुरुकुलचे विद्यार्थी आज देशाच्या बाहेर गेले आहेत पण गुरुकुलचे संस्कार विसरले नाहीत, उत्तम जीवन जर हवं असेल तर संत बरोबर रहा. आयुष्यात कधी वाईट मार्गावर जाणार नाहीत असं बोलून त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन आशीर्वाद दिला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपापले मनोगत व्यक्त करताना भावुक झाले होते. या कार्यक्रमात मुख्य उपस्थिती म्हणून साधू कृष्णचरणदासजी स्वामीजी, श्रीस्वामिनारायण गुरुकुल नवी मुंबईचे संचालक परमपूज्य विश्वमंगलदास स्वामीजी, ब्रम्हस्वरूप स्वामीजी व गुरुकुलचे मुख्याध्यापक डॉ.पी. हरिबाबू रेड्डी आणि सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी वर्ग, पालकवर्ग व कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मोहोपाड्यात साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री साई आवडी प्रेमभावे या अंगानुसार श्री साईबाबा मंदिर मोहोपाडा येथे २६वा वर्धापन दिन पारंपारिक पध्दतीने मोठ्या उत्साहात, आनंदात जल्लोषात साजरा करण्यात आला.



या वेळी संपूर्ण जनआरती साईमय झाल्याचे पहावयास मिळाले. श्री साईबाबांचा जयघोष करीत भक्तगण मंदिरात प्रवेश करत होते. श्री संत तुकाराम महाराज यांच्याअभंगाप्रमाणे आनंदाच्या डोई आनंद तरंग यानुसार भक्तगण तल्लीन झाल्याचे दिसून आले. श्री साई मंदिराचे अध्यक्ष एम. एस. मगर व उपाध्यक्ष जयवंत आंबवणे यांनी सर्वांचे मनपुर्वक शब्दसुमनाने आभार मानले. या वेळी गायनी यज्ञाचे आयोजन करण्यात आले. पंचक्रोशीतील प्रथमच सर्व सरपंच यांना आमंत्रीत करून महाकुंडावरील यजमान पद देण्यात आहे. मोहोपाडा ग्रामपंचायत मधील प्रथम नागरीक म्हणून श्री व सौ. उमा संदीप मुंढे यांना गायत्री यज्ञाचा मुख्य पीडाय यजमान पद देण्यात आले. देवलेली सरपंच राजश्री रा. पारीक, श्री व सौ. गितांजली गुरुनाथ गाताडे सरपंच वावेघर, तुराडे सरपंच रंजना गायकवाड, सावळे सरपंच श्री व सौ. सुनील माळी आदी उपस्थित होते.

सायंकाळी साईबाबांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री व सौ संजय बांगर वरीष्ठ पोलीस निरीक्षक रसायनी यांनी यजमान पद भुषविले, तसेच सायंकाळी श्रीपती बाबा भजन मंडळ डिकसल यांचे संगीत भजन तसेच राधाकृष्ण मंडळ कुडेवहाल, गायक स्वरसम्राट संदीप बुवा यांचे संगीत भजन मंडळाचे गवई भजन सम्राट जमवंत बुवा आंबवणे व ज्ञानेश्वर भगत भजनी मंडळ धामणी यांच्या भजनाने विशेष शोभा आणली. या कार्यक्रमाचे सुमसंचालन जयवंत म्हात्रे यांनी उत्तमप्रकारे केले. सायंकाळी अन्नदानाचे (साई भंडारा)चे आयोजन करण्यात आले.

# जंजिरा जेट्टीच्या कामात मच्छीमारांना त्रास नको

## भाजपच्या दीपक गीते यांची मागणी; आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन



**मुरुड : प्रतिनिधी**

प्रसिद्ध जंजिरा किल्ल्याच्या मागील बाजूस नवीन जेट्टी बांधण्याचे काम जोरात सुरू आहे. पर्यटकांना सुविधा प्राप्त करून देण्यासाठी हे काम चालू आहे. या कामामुळे स्थानिक मच्छीमारांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी संबंधित ठेकेदार याने घेणेसुद्धा आवश्यक आहे. विकासकामाच्या आड आम्ही येणार नाही, परंतु ठेकेदाराने मच्छीमारांची काळजी तेवढीच घेतली पाहिजे, असे प्रतिपादन भाजप मच्छीमार सेलचे मुरूड तालुका अध्यक्ष दीपक गीते यांनी केले आहे. राजपुरी येथे या जेट्टीच्या कामाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना ते पत्रकारांशी बोलत होते.

या वेळी गीते यांनी सांगितले की, राजपुरी खाडीमध्ये होत असलेल्या विकासकामांना मच्छीमारांचा विरोध नाही, परंतु या राजपुरी खाडीवर उदरनिर्वाह करणाऱ्या मच्छीमारांना शासकीय अधिकारी विश्वासात घेत नाही. याचा मोठा असंतोष मच्छीमार बांधवांच्या मनात धुमसत आहे आणि राजरोसपणे होणारी दिघी पोर्ट, दास ऑफशोर व खाडीमध्ये होणाऱ्या विकसकांची मालाची होणारी वाहतूक यामुळे राजपुरी खाडीतील मच्छीमार बांधवांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. याबाबतसुद्धा सहानुभूती दाखवणे खूप आवश्यक आहे.

विकासकाम होत असताना जे नुकसान होत असेल तर त्याची भरपाईसुद्धा देणे आवश्यक आहे. येथील कोळी समाज गरीब असून त्यांचा उदरनिर्वाह हा मासेमारीवरच अवलंबून आहे. जेट्टीच्या कामामुळे काही नुकसान होत असेल तर त्याची भरपाई त्वरित देणे हे ठेकेदाराचे आद्य कर्तव्य आहे. जंजिरा किल्ल्याची जेट्टी बांधणाऱ्या ठेकेदाराने स्थानिक मच्छीमारांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी भाजपच्या गीते यांनी केली आहे.

# सद्भाव फाउंडेशनकडून कर्जतमध्ये रुग्णालयास मदत

**कर्जत : प्रतिनिधी**

सदभाव फांउडेशन मुंबई शाखा कर्जत यांच्या माध्यमातून उपजिल्हा रुग्णालात बसण्यासाठी बाकडे देण्यात आले. कळंबोलीवाडी येथे हळदीकुंकु कार्यकम घेण्यात आला व साड्यावाटप करण्यात आले.

कर्जत व खालापुर तालुक्यात रोटरी क्लब बॉम्बे मेट्रोपॅलिटन व सद्भाव फांउडेशनच्या संयुक्त विद्यमाने १६० वैयक्तिक शौचालय बांधून झाले आहेत. त्याचे उद्घाटन संस्थेचा ट्रस्टी नीता दोशी तसेच रोटरी क्लॅबचे निमीश, रक्षा बेन, कराचीवला, हिना बेन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास नसरापूर सरपंच जयवंती कोळंबे, उपसरपंच श्वेता हाडप, प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड, प्रवीण पाटील, प्रगती पाटील, संतोष धकवळ, संतोष पारे, केतन लाड, संपद हडप, दशरथ देशमुख, विजय मते, चित्रा लोहकरे, सदा मते, विठोबा पाटील, मतेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.



# ‘बिर्ला कार्बन इंडिया’कडून शैक्षणिक साहित्य, हेल्थ किट वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात तसेच परिसरातील शाळांमध्ये सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. दरवर्षी दहावी, बारावी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी शुभचिंतन समारंभात शैक्षणिक साहित्य व हेल्थ किटचे वाटप केले जाते. या कार्यक्रमाचे औचित्य साधत बिर्ला कार्बन कंपनी पाताळगंगा कंपनीमध्ये सदिच्छा भेट देण्यासाठी आलेले बिर्ला कंपनीचे अमेरिकन अधिकारी पाहुणे, प्रमुख अतिथी रॅंडी वास्कूल (ग्लोबल सेफ्टी हेल्थ ऑफिसर) यांनी उपस्थिती दाखवत आपल्या



हस्ते विद्यार्थ्यांसाठी एक्झाम पॅड, गुड नाईट किट,डेटॉल बॉटल, मास्क, सॅनिटायझर, कंपास पेटी, पेन, टूथब्रश, टूथपेस्ट, साबण इत्यादी स्वरूपाच्या हेल्थकिटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बिर्ला कार्बन कंपनीच्या सीएसआर फंडातून नामांकित गोदरेज कंपनीचे ४० बेंचेस रॅंडी वास्कूल यांच्या हस्ते शाळेसाठी प्रदान करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या सोबतच मी हिकमन, हेली शाह, मॅलथॉस या सर्व परदेशी पाहुण्यांचे संस्कृतीप्रमाणे यथोचित सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर बिर्ला कार्बन कंपनीचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी, विजय अग्रवाल, पुर्निंदो कुमार, संदीप कुमार, निखिल भामरे (मानव संसाधन विभाग प्रमुख) सचिन कंदले, मयुरी शिरोडकर, सीएसआर प्रमुख लक्ष्मण मोरे, प्रशांत गायकवाड आदी कंपनीतील अधिकारीवर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख पाहुण्यांना समजावे या उद्देशाने विद्याप्रसारिणी सभा चौक संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख यांनी प्रास्ताविकपर विचार व्यक्त करीत कंपनीने शाळेसाठी शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देत असल्याबद्दल आभार व्यक्त केले. या वेळी रॅंडी वास्कूल यांनी आपल्या भाषणातून पुन्हा शाळेत येण्याची इच्छा व्यक्त करीत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा, मुख्याध्यापक श्री. भोमले, उपमुख्याध्यापिका पुजारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल बडेकर यांनी केले, तर आभार दिपाली आटोळे यांनी केले.

# शिवजयंतीनिमित्त महारक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेच्या वतीने सलग आठव्या वर्षी केईएम रुग्णालय परळ मुंबई यांच्या सहकार्याने शिवजयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी २०२४ रोजी महारक्तदान शिबिराचे आयोजन कुणबी भवन हॉल येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वा. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, नगराध्यक्ष तथा संस्थेचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पवार, राष्ट्रवादी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांच्या हस्ते होणार आहे.

# निराधार महिलेला आसरा देण्याची मागणी; निवेदन सादर

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी खालापूर येथील एका निराधार महिलेला गावठाणमध्ये जागा मिळावी यासाठी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले.



या निवेदनात म्हटले आहे की, खालापूर नगरपंचायत हद्दीत राहणाऱ्या जयश्री विजय लोंढे निराधार असून बेघर आहेत. महिलेच्या पतीचे २०२१मध्ये कोरोना काळात निधन झाले. या महिला येथील कायमस्वरूपी रहिवासी आहेत, मात्र त्यांना राहण्याकरिता कुठलीही व्यवस्था नाही. याआधी वारंवार या महिलेने नगरपंचायत कार्यालयाकडे राहण्यासाठी जागा मिळावी अशी मागणी केली आहे, मात्र या महिलेला कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे नगरपंचायतीने या महिलेस राहण्यासाठी गावठाण हद्दीत कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या वेळी वंचित जिल्हा युवक अध्यक्ष अमित गायकवाड, जिल्हा महासचिव वैभव केदारी, खालापूर महासचिव महेंद्र मंगेश ओव्हाळ, अध्यक्ष प्रवीण भालेराव, युवक अध्यक्ष प्रशांत गायकवाड व रुपेश गायकवाड आदी उपस्थित होते. या संदर्भात मुख्याधिकारी म्हणाल्या की, या प्रकरणाबाबत कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या शिबिरात ५५ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

नरेंद्राचार्य महाराज संस्थान व कर्जत तालुका सेवा समिती स्व.स्वरूप संप्रदायाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५५ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ४८९वे रक्तदान शिबिर ठरले.

कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संप्रदायातील सर्व भक्तगणांनी माऊलीच्या नाम गजराने झाले. या वेळी संप्रदायातील अनेक भक्तगण उपस्थित होते. रक्त संकलानाचे काम डिकसळ येथील रायगड हॉस्पिटल रक्त केंद्राचे डॉ. अलीशा हरपुडे, प्रीती लोंढे, भाविका पाटील, यशवंत ठाकूर, साहिल कदम, अर्चना डोईफोडे आदींनी केले.

या शिबिरास सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, आमिर मणियार, भूषण बाफना साईनाथ श्रीखंडे, चंद्रकांत पाटील, मोहिनी लोभी, रघुनाथ मराडे, ऊर्वी मेहता, विद्याधर गोळन, मनीषा बडे, अर्पिता सावळ, साईनाथ भोईर, कुंदा घुडे, विद्या पानसरे, विजय लोभी, ऋतुजा पडळकर, अनिल कडू, दिनेश बर्जे, हेमंत पवार, अशोक भाटकर आदी उपस्थित होते.



# खरोशी येथे आरोग्य शिबिर



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील खरोशी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मानसी महेश घरत, कुलदैवत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ खरोशी व केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था महाराष्ट्र आणि तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने माघी गणेशात्सवानिमित्त मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी १४१ नागरिकांना मोफत चष्मा रोटरी क्लब आकुर्डी पुणे येथील राजु तुपे यांच्या सौजन्याने देण्यात आले. शिबिराचा लाभ खरोशी गावातील ४१५ नागरिकांनी घेतला.

शिबिरासाठी सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ घरत, महेश घरत, उपसरपंच मानसी महेश घरत, पत्रकार धनाजी घरत, कांचन घरत, विद्या घरत, तृप्ती ठाकुर, अनंता ठाकुर, सुधाकर घरत, विजय ठाकुर, गणपत पाटील, प्रकाश घरत, यशवंत घरत, मनोज गावंड, प्रीतम भोंडकर आदींनी परिश्रम घेतले.

# सुधागड रहिवासी संघाचा स्नेहमेळावा उत्साहात




**पाली : प्रतिनिधी**

ठाण्यात वास्तव्यास असलेल्या सुधागड तालुका रहिवाशांच्या सेवेसाठी झटणार्या सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेतर्फे आयोजित श्री सत्यनारायण महापूजा व स्नेहमेळावा कार्यक्रम शनिवारी रायगडगल्ली, पाचपाखाडी येथे उत्साहात झाला. या वेळी महिला मंडळाचा हळदी कुंकू समारंभही पार पडला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण पुंडलिक मोरे यांच्या स्वरतेज, मराठी वाद्यवृंद कार्यक्रमाने रसिकांची मने जिंकली. या वेळी ठाण्याचे माजी महापौर आणि शिवसेना प्रवक्ता नरेश म्हस्के, शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, आमदार ॲड. निरंजन डावखरे, ठाणे शहर प्रमुख अशोक वैती, भामपा मा. नगरसेवक संदीप लेले, स्थानिक माजी नगरसेविका रुचिता राजेश मोरे, माजी नगरसेवक नारायण पवार, उद्योजक विजय सागळे यांच्या ठाणे आणि तालुक्यातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

# साळाव बिर्ला गणेश मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान अन् पर्यटकांचे आकर्षण

रायगड हा ठाणे, पुणे, मुंबई व रत्नागिरी जिल्ह्यांना जवळचा जिल्हा आहे. अशा या जिल्हातील मोजक्याच तालुक्यांना समुद्रकिनारा लाभला आहे. त्यातील मुरुड तालुका म्हणजे प्रति गोवा मानले गेले असल्याने एक दिवसाचे पर्यटनस्थळ म्हणून खास आकर्षण आहे. काही वर्षापूर्वी मुरूड तालुक्यात साळाव येथे बिर्ला उद्योग समुहाने विक्रम वसाहत प्रकल्पाच्या मधील छोट्याशा टेकडीवर विक्रम विनायक मंदिर बांधले. हे मंदिर अल्पावधीत भाविकांचे श्रद्धास्थान आणि पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्धीस आले आहे.



रोहा-रेवदंडा कुंडलिका खाडीलगत व रेवदंडा-रोहा मुख्य रस्त्यावरील साळाव या गावानजीक टेकडीवर बिर्ला समुहाने हे विक्रम विनायक मंदिर पंरपरेने बांधले आहे. मंदिर राजस्थान व गुजरातमधील संगमवरी दगडातून उभारलेले आहे. मुंबईच्या शापुरजी मालनजी बिल्डर्सनी भव्य व दिव्य असे बांधकाम केले.

टेकडीवर मंदिराकडे जाण्याकरीता पायऱ्या व मोटर रस्ता असे दोन मार्ग आहेत. टेकडीच्या पायथ्याशी दोन सुंदर सिंह शिल्पे आहेत. मंदिराचे बांधकाम दोन सभामंडप व गर्भगृह अशा प्रकारचे असून सभामंडपाचे छत संपूर्णपणे पारदर्शक असून चारही बाजूना सभामंडप खुला आहे. मुख्य गाभाऱ्यात श्री विनायकाची भव्य संगमवरी मूर्ती आहे. मूर्तीसोबत शंकर-पार्वती, दुर्गामाता, रिद्धीसिद्धी, राधाकृष्ण व सूर्यदेवाचीही मुती आहे. सर्व मूर्ती जयपुरहून आणलेल्या कसबी कारागिरांनी घडविल्या असून आकाशात उंच सुळक्यासारख्या जाणाऱ्या शुभ्र संगमवरी कळसामुळे मंदिराची शोभा विशेषत्वाने वृध्दींगत झालेली आहे.

मंदिर म्हटले की पूजा-अर्चा आलीच. या मंदिरासाठी वृदावंन येथून खास दोन पुजारी आणलेले आहेत. सकाळी ६ ते ११.३० व सायंकाळी ४.३० ते ९ या वेळात भक्तांना मंदिरात प्रवेश दिला जातो. मंदिरात परिसरात रमणीय बाग असून बागेत सायंकाळी अविस्मरणीय विद्युत रोषणाई पहावयास मिळते. मुळातच निसर्गरम्य असलेल्या या परिसरात शोभा वाढविणारे हे मंदिर निर्सगाशी एकरूप झालेले दिसते. बागेमध्ये स्व. आदित्य बिर्ला यांचा पुतळा आहे. बागेत कारंजे असून तेही विद्युत रोषणाईत अधिकच प्रेक्षणीय झाले आहे.

मुंबई, पुणे, रत्नागिरी अशा अनेक शहरातून भाविक व पर्यटक येथे येत असतात. विशेषतः संकष्ट चतुर्थीसारख्या धार्मिक महत्त्वाच्या दिवसांव्यतिरिक्त रविवारी व अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यटकांसह भाविकांचे मोठे लोंढे येतात. विशेष म्हणजे सर्वधर्मीय नागरिक दर्शन घेतात. मंदिरामुळे स्थानिकांना व्यवसाय निर्माण झाला आहे. या परिसरास दिवसभर पुण्याच्या सारसबागेसारखे स्वरूप प्राप्त झाले आहे. येथील ऑटोरिक्षा, सितारा व्हॅन यांनाही पर्यटकांमुळे उद्योगधंदा मिळतो. मंदिराच्या समोरील भागात रसवंती गृह, खाद्यपदार्थांचे विविध स्टॉल, छोटी उपाहारगृहे, नारळ व फुलांच्या हातगाड्या, चणे, फुटाणेवाले ते स्थानिक परिसरातील भाजी व फळविक्रेते या सर्वांना व्यवसाय निर्माण झाला आहे. प्रकल्पाने मंदिराचा समोरील भागात खासगी बस वाहनासाठी वाहनतळ उभारला आहे, मात्र वाहनांची आवक पहाता तो आता अपुरा पडत आहे. पर्यायाने वाहने रस्त्यावर उभी करावी लागत असल्याने ट्रफिक समस्या निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अलिबाग आगाराच्या दिवसभरात तुरळक बसफेऱ्या धावतात. पेण आगाराने शनिवारी व रविवारी ठेवलेली बसफेरी रद्द केली आहे. मुरूड, पेण, रोहा, महाड, कर्जत, श्रीवर्धन, बस आगारातून बिर्ला विनायक मंदिराकडे पर्यटन बससेवा सुरू करावी अशी मागणी पर्यटकांकडून करण्यात येत आहे.

मंदिराच्या प्रवेशव्दाराजवळ दोन ते चार सुरक्षा अधिकारी ठेवण्यात आले असून त्या ठिकाणी भक्तमंडळीच्या सामानाची तपासणी होते. सामान ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली असून परवनागीशिवाय कोणालाही छायाचित्र काढता येत नाही. मासिक, साप्ताहिके, दैनिक अशा प्रसिद्धी माध्यमातून काम करणाऱ्यांना छायाचित्र काढण्यास परवानगी आहे, मात्र तशा प्रकारचा सुरक्षा अधिकारी वर्गाकडे संपर्क साधावा लागतो.

असे हे बिर्ला मंदिर एक दिवसीय पर्यटनक्षेत्र बनलेले व भाविकांचे श्रद्धास्थान आर्थिक व वेळेच्या दृष्टीचे सोयीचे स्थळ आहे. प्रत्यक्ष भेट दिल्यावर निसर्गाच्या आस्वादाचा पर्यटक बनल्याचा मनाला आनंद नक्कीच मिळतो.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# जैस्वालची पुन्हा 'यशस्वी' खेळी



## इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या दिवसअखेर भारताकडे ३२२ धावांची आघाडी

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने राजकोट कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात शतक झळकावले, पण त्यानंतर तो पाठीच्या समस्येशी झुंजताना दिसला. त्याला मदत करण्यासाठी भारतीय फिजिओ दोनदा मैदानात आले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही आणि शेवटी त्याला मैदान सोडावे लागले. यशस्वीने मैदान सोडल्यानंतर काही षटकानंतर तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला. भारतीय संघाने दुसऱ्या डावात ५१ षटकानंतर २ बाद १९६ धावा केल्या असून ३२२ धावांची आघाडी घेतली आहे.

या सामन्यांच्या दुसऱ्या डावात सलामीवीर यशस्वी जैस्वालने मार्क वूडला चौकार ठोकत तिसरे कसोटी शतक झळकावले. त्याने १२२ चेंडूंचा सामना करताना नऊ चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने शतक झळकावले. यानंतर या खेळीत फक्त चार धावा जोडल्यांतर यशस्वी जैस्वाल रिटायर्ट हर्ट झाला. तत्पूर्वी त्याने शुबमन गिलबरोबर १५५ धावांची भागीदारी साकारली. विशेषतः जैस्वाल वनडे स्टाइलमध्ये फटकेबाजी केली. जैस्वाल दुखापतग्रस्त होऊन रिटायर्ड हर्ट झाला. तो पुढे फलंदाजीला येणार की नाही याबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अद्याप कोणतीही पुष्टी केलेली नाही.

दुसऱ्या डावात भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार रोहित शर्मा १९ धावा करून बाद झाला, तेव्हा भारताची धावसंख्या ३० धावा होती. त्यानंतर यशस्वी जैस्वालसह शुबमन गिलने तिसऱ्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. त्यांनी इंग्लिश गोलंदाजाविरुद्ध दमदार फटकेबाजी केली. मग यशस्वी जैस्वाल पॅव्हेलियनमध्ये परतला आणि ही भागीदारी तुटली. यशस्वीने मैदान सोडल्यानंतर रजत पाटीदार चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता, मात्र त्याला साधा भोपळही फोडता आला नाही. सध्या कुलदीप यादव तीन धावांवर आणि शुबमन गिल ६५ धावांवर नाबाद आहे. इंग्लंडकडून जो रूट आणि टॉम हार्टले यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

दुसऱ्या डावात भारताची एकूण आघाडी आतापर्यंत ३२२ धावांची झाली आहे. भारताने पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या, तर इंग्लंडचा पहिला डाव ३१९ धावांवर आटोपला. पहिल्या डावाच्या जोरावर भारताला दुसऱ्या डावात १२६ धावांची आघाडी मिळाली. ही आघाडी वाढविण्याची भारताला संधी आहे. चौथ्या दिवशी उर्वरित फलंदाज कशी फलंदाज करतात यावर पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

# शेलूमध्ये भाजप नमो चषक बैलगाडा शर्यतींचा धुरळा

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघामध्ये भारतीय जनता पक्ष व कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या माध्यमातून नमो बैलगाडा शर्यतींचे आयोजन शुक्रवारी (दि.१६) कर्जतमधील शेलू येथे करण्यात आले होते. ठाणे, रायगड जिल्ह्यातील हजारो बैलगाडा स्पर्धकांनी यामध्ये सहभाग घेतला. या वेळी १७० शर्यतींचा धुरळा पहावयास मिळाला.






शेलू ढोणे येथील चेडोबा मैदानावर रंगलेल्या या शर्यतींच्या उदघाटन सोहळ्याला भाजप नेते किरण ठाकरे, जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, तालुका उपाध्यक्ष नरेश मसणे यांच्यासह कर्जत तालुका बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष नारायण डामसे, भगवान चंचे, विजय म्हसकर, सरपंच शिवाजी खारीक आदी उपस्थित होते.

जय चेडोबा मंडळाच्या वतीने बैलगाडा शर्यतींचे संयोजन करण्यात आले होते. या शर्यतींसाठी बैलगाडा शर्यतीचे मुंबई अध्यक्ष संदीप माळी, उपाध्यक्ष अविनाश पवार, पप्पू पाटील, भगवान पाटील, सोन्या बैलाचे मालक जयेश पाटील आवर्जून उपस्थित होते. राणा या बैलाचे मालक भोपर येथील संदीप माळी आणि शेलू येथील सदानंद मसणे यांच्या बैलजोडीची शर्यत रंगतदार झाली. पाच हजारांपासून ते २५ हजारांपर्यंतच्या शर्यती मैदानावर रंगल्या.

या स्पर्धेला माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, सुनील गोगटे, सरचिटणीस दीपक बेहरे, मंदार मेहंदळे, रमेश मुंढे, शरद लाड, राजेश लाड, अनिल जैन तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बैलगाडा शर्यतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वीतसाठी संजय कराळे, ऋषिकेश जोशी, प्रज्ञेश खेडकर, किशोर ठाकरे, सागर ठाकरे, राजेश ठाणगे, विशाल कोकरे, अभिजित पटेल, अभिषेक तिवारी, दीपक शेकटे समीर बोराडे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## भारतीय भूमीवर जडेजाच्या २०० कसोटी विकेट्स पूर्ण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने राजकोट कसोटीत चेंडूने इतिहास रचला आहे. खरेतर पहिल्या डावात फलंदाजी करीत शतक झळकावणाऱ्या रवींद्र जडेजाने गोलंदाजी करताना इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सला बाद करत पहिला बळी घेतला. यासह जडेजाने भारतीय भूमीवर २०० कसोटी बळी पूर्ण केले. अशी कामगिरी करणारा तो पाचवा भारतीय ठरला आहे.

रवींद्र जडेजाने भारतीय भूमीवर ४२ सामन्यांत २०० कसोटी बळी पूर्ण केले आहेत. जडेजापूर्वी कपिल देवने ६५ सामन्यांत २१९, हरभजन सिंगने ५५ सामन्यांत २६५ बळी, अश्विनने ५८ सामन्यांत ३४७ बळी आणि अनिल कुंबळेने ६३ सामन्यांत ३५० कसोटी बळी घेतले होते. याशिवाय २०० देशांतर्गत विकेट्स पूर्ण करणारा जडेजा दुसरा डावखुरा फिरकी गोलंदाज ठरला आहे. त्याच्याआधी श्रीलंकेचा दिग्गज रंगना



हेरातच्या नावावर २७८ कसोटी बळी आहेत. ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क (२१७) हा मायदेशात कसोटीत २००हून अधिक बळी घेणारा एकमेव डावखुरा वेगवान गोलंदाज आहे.

डिसेंबर २०१२मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा जडेजा हा तिन्ही फॉरमॅटमध्ये संघाचा नियमित खेळाडू आहे. १२ वर्षांपासून कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या जडेजाने केवळ देशांतर्गत २०० कसोटी विकेट्स पूर्ण केल्या नाहीत, तर त्याने ५०० प्रथम श्रेणी विकेट्सदेखील पूर्ण केल्या.

## पेणमध्ये क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाच्या मैदानावर वंचित बहुजन आघाडीचे पेण तालुका अध्यक्ष व महासचिव सुनील धामणकर यांच्या पुढाकाराने वंचित बहुजन आघाडी चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास पनवेल महासभा अध्यक्ष डी.डी. गायकवाड, महासचिव संतोष मुजमुले, माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, हमरापूर ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया पाटील, शाखा अध्यक्ष अतुल जाधव, रोडे उपाध्यक्ष अक्षय दाभाडे, पेण तालुका संघटक सागर ढिलपे, सदस्य राष्टपाल भराडे आदी उपस्थित होते. पोलीस आणि पत्रकार यांच्या प्रदर्शनीय सामन्याने स्पर्धेला सुरुवात झाली.

### श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

## खो-खोमध्ये मुंबई प्रो लायन्स, शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीला विजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रीडा महाकुंभमधील स्पर्धा आता उत्तरार्धात पोहचल्या असून मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील सहा केंद्रांवर झालेल्या संघांमधून विजेत्या संघामध्ये अंतिम महामुकाबले सुरू झाले आहेत. काही वैयक्तीक स्पर्धांचे अंतिम निकाल यापूर्वीच लागले असून काही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आहेत. खो-खो स्पर्धेत शहर व उपनगरातील प्रत्येक गटात दोन-दोन संघ अंतिम फेरीत लढले. या स्पर्धेत पुरुषांचे विजेतेपद एमपीएल (मुंबई प्रो लायन्स)ने शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीवर विजय मिळवित, तर महिलांमध्ये शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीने शिवनेरीचा पराभव करीत मिळविले.



पुरुषांच्या अंतिम सामन्यात एमपीएलने शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीवर १२-१० असा ४ मि. राखून दोन गुणांनी शानदार विजय साजरा केला. एमपीएलच्या सुरज खाके (२.४०, १.४० मि. संरक्षण व दोन गुण), ओमकार मिरगळ (२, १.५० मि. संरक्षण व एक गुण), ओम भरणकर (नाबाद २ मि. संरक्षण व एक गुण), हितेश आंग्रे (१.२ मि. संरक्षण व दोन गुण) यांच्या अष्टपैलू व धमाकेदार खेळीने शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीवर मोठा विजय साजरा केला. शिर्सेकर्सच्या दीपक माधव (२.३०, १.१० मि. संरक्षण), दिपेश मोरे (२,२ मि. संरक्षण) ऋषिकेश मुर्चावाडे (चार गुण) यांना इतर खेळाडूंकडून योग्य साथ न मिळाल्याने पराभवाला सामोरे जावे लागले.

महिलांच्या अंतिम सामन्यात शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीने शिवनेरीचा सेवा मंडळाचा १०-८ असा एक डाव दोन गुणांनी पराभव केला. शिर्सेकर्स महात्माच्या सिद्धी हिंदळेकर (३ मि. संरक्षण व एक गुण), देविका अहिरे (२.४०, नाबाद १.५० मि. संरक्षण व एक गुण), साक्षी वाफेलकर (२.४० मि. संरक्षण व तीन गुण), काजल गायकवाड (नाबाद २.१०, १.२० मि. संरक्षण) यांनी विजयात मोलाची कामगिरी बजावली. शिवनेरीच्या मुस्कान शेख (२ मि. संरक्षण), प्रतीक्षा महाजन (१.४० मि. संरक्षण व एक गुण) व शिवानी गुप्ता (१.२० मि. संरक्षण व एक गुण) यांची कामगिरी अपुरी ठरल्याने शिवनेरीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

कुमार (१७ वर्षाखालील) गटात शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीने ओम साईश्वर सेवा मंडळाचा १०-८ असा एक डाव दोन गुणांनी पराभव केला. शिर्सेकर्सच्या सुशील चव्हाण (नाबाद १.२०, २.२० मि. संरक्षण व एक गुण), कार्तिक चांदणे (२ मि. संरक्षण व दोन गुण) व समर्थ सावंत (२ मि. संरक्षण) यांनी विजयी खेळी केली. ओम साईश्वरच्या सार्थक माडये (१,२० मि. संरक्षण) व अधिराज गुरव (चार गुण) यांनीच थोडाफार चांगला खेळ केला.

मुलींच्या सामन्यात शिवनेरीचा सेवा मंडळाने शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीवर ८-७ असा चुरशीच्या सामन्यात एक गुणाने विजय साजरा केला. आरुषी गुप्ता (१.३०, ३.४० मि. संरक्षण व एक गुण), मुस्कान शेख (२ मि. संरक्षण व एक गुण), सिद्धी शिंदे (३ मि. संरक्षण), गौरी गुप्ता, शर्वी नडे व जिक्र शेख (प्रत्येकी दोन गुण) यांच्या जोरदार खेळीने विजय साजरा केला. शिर्सेकर्सच्या धानी रोळेकर (३.३० मि. संरक्षण व तीन गुण), दिव्या गायकवाड (२.४० मि. संरक्षण व दोन गुण), दिव्या चव्हाण (२ मि. संरक्षण व एक गुण) व लक्ष्मी धनगर (२.१० मि. संरक्षण) यांनी दिलेली निकराची लढत कमी पडली.

किशोर गटात महात्मा गांधी विद्या मंदिरने ओम साईश्वर सेवा मंडळाचा २०-१९ असा चुरशीच्या सामन्यात गुणाने विजय मिळवला. महात्माच्या आर्यन चव्हाण (२ मि. संरक्षण), अक्षय राठोड (१.१०, १ मि. संरक्षण व सहा गुण), अनिल राठोड (१.१० मि. संरक्षण व तीन गुण), अमेय मुर्चावडे (चार गुण), आदित्य राठोड (१.३० १.२० मि. संरक्षण व दोन गुण) यांची कामगिरी विजयात, तर ओम साईश्वरच्या प्रशिक मोरे (१.२०, १ मि. संरक्षण व चार गुण), अधिराज गुरव (१ मि. संरक्षण व नऊ गुण), सुजल गुरव (१.४०, १.२० मि. संरक्षण) यांची कामगिरी पराभवातसुद्धा उठून दिसली.

किशोरींच्या गटात शिवनेरीचा सेवा मंडळाने विद्या प्रबोधिनी इंग्लिश शाळेचा ९-६ असा एक डाव तीन गुणांनी पराभव केला. शिवनेरीच्या मुस्कान शेख (नाबाद ६.३० मि. संरक्षण व दोन गुण), शर्वी नडे (३ मि. संरक्षण व दोन गुण), आरुषी गुप्ता (२.४० मि. संरक्षण) यांनी; तर सृष्टी जाधव (२ मि. संरक्षण), विभूती धुळप (१.१० मि. संरक्षण व दोन गुण) यांनी सामना गाजवला. विजेत्या सर्व संघांना रोख रक्कम, क्रीडा कुंभ चषक, सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

## मुरूडमध्ये शालेय क्रीडा स्पर्धा रंगली

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद शिक्षण विभागाच्या वतीने मराठी शाळा क्रमांक ४ येथे शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना माजी क्रीडा शिक्षक पांडुरंग आरेकर यांनी शिक्षणाबरोबरच मैदानी खेळदेखील महत्त्वाचे आहेत, असे सांगितले.




उद्घाटन समारंभास नगर परिषद शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी दिपाली दिवेकर, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, डॉ. मकबुल कोकाटे, संजय गुंजाळ, प्रमोद भायदे, विजय सुर्वे, सिदेश लखमदे, विजय सुर्वे, युगा ठाकूर, उषा खोत, सायली गुंजाळ यांच्यासह मराठी शाळेतील शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांमध्ये रस्सीखेच खेळ रंगला.

आरेकर पुढे म्हणाले की, मैदानी खेळ खेळल्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते. खेळ हा व्यक्तीच्या जीवनातील अविभाज्य घटक असून कोणत्याही खेळात मिळविलेले प्राविण्य आपले करिअर घडवू शकते.

## आनंद महिंद्रांकडून सर्फराझच्या वडिलांना मिळणार 'थार' भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतातील प्रसिद्ध उद्योगपती आनंद महिंद्रा यांनी क्रिकेटर सर्फराझ खानचे वडील नौशाद खान यांना नवीन थार गाडी भेट देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. महिंद्रा यांनी एक प्रेरणादायी पालक असल्याबद्दल नौशाद यांचे कौतुक केले.

महिंद्रा यांनी शुक्रवारी मायक्रोब्लॉगिंग साइट एक्सवर एका पोस्टद्वारे ही घोषणा केली. त्यांची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली असून लोक त्यांच्या उदारतेचे कौतुक करीत आहेत. सर्फराझ खानने कसोटी पदार्पणाच्या सामन्यात शानदार फलंदाजी करीत अर्धशतक झळकावले. त्याने आपल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात ६२ धावांची जलद खेळी खेळली. सर्फराझने बाद होण्यापूर्वी ज्या निर्भयतेने फलंदाजी केली त्याची सर्वजण प्रशंसा करीत आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com